गुरुवार, २ नोव्हेंबर २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - ८७
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) THURSDAY 2 NOV. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-03 • ISSUE-87 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-5


# सरकारला वेळ कशासाठी पाहिजे ?

## मनोज जरांगे पाटील : सर्वपक्षीय बैठकीनंतर सवाल

आधुनिक केसरी न्यूज

**जालना : सरकारला वेळ किती आणि कशासाठी पाहिजे? सरसकट मराठा समाजाला आरक्षण देणार का? हे सांगाव. सर्वपक्षीय बैठकीत काय चर्चा झाली? त्याचा तपशील जाणून घेण्याची अजिबात इच्छा नाही, असे मनोज जरांगे पाटील म्हणाले. बुधवारी मुंबईत सर्वपक्षीय बैठक झाल्यानंतर मनोज जरांगे पाटील यांनी ही प्रतिक्रिया दिली.**



गोरगरीबाच्या लेकरावर गुन्हे दाखल करण्याच काम सरकारकडून सुरु आहे. ते हसण्यावारी नेतात. आरक्षण द्या, अरे-तुरे बोलण बंद करतो. तुम्हाला वेळ कशासाठी पाहिजे, असा सवाल जरांगे पाटील यांनी विचारला. तुम्ही मराठ्यांना सरसकट कुणबी प्रमाणपत्र देणार का? हे सांगा. तुमच्या मनात काय आहे? हे कळू दे. मराठा समाज दगाफटका करणारा नाही. आमच्याकडून खोट नाट वदवून घेऊ नका, असे जरांगे पाटील म्हणाले. सरकारचा अध्यादेश आम्हाला मान्य नाही. वेळ घेऊन सरसकट आरक्षण देणार का?. आम्हाला अर्धवट आरक्षण नको. आरक्षण मिळेपर्यंत आंदोलन थांबणार नाही, असे जरांगे पाटील यांनी स्पष्ट केले. चर्चा करायची हे आंदोलनाला बसण्याआधी का नाही सांगितले? आठ दिवस रक्त जाळल्यानंतर यांना जाग आली. पण मी माझ्या समजासाठी तयार आहे. मराठा समाजाला गरम केले जाते, असे मनोज जरांगे पाटील म्हणाले. यांना का आणि कशासाठी वेळ पाहिजे. हे त्यांनी इथे येऊन महाराष्ट्राला सांगावे. त्यानंतर आम्ही विचार करु असे जरांगे पाटील म्हणाले. फडणवीस यांनी इथे यावे, मराठे त्यांना अजिबात अडवणार नाहीत. मी चर्चेसाठी बोलावले पण ते आले नाहीत. आम्ही मनावर घेतले, तर यांचा आवाज 5 मिनिटांत बंद होईल, असे जरांगे पाटील म्हणाले. मनोज जरांगे पाटील यांच्या आमरण उपोषणाचा आज आठवा दिवस आहे. त्यांनी आज संध्याकाळपासून पाणी बंद करणार असल्याची घोषणा केली आहे. जरांगे पाटील सध्या समाजाच्या विनंतीला मान देऊन पाणी पिताहेत. सहाव्यादिवशी त्यांची प्रकृती ढासळली होती. पण आता पाणी पिल्यामुळे प्रकृती थोडी बरी आहे.



**आरक्षण देण्यासाठी राज्यातील सर्वच पक्ष एकत्रितपणे काम करायला तयार :** मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबत सर्वांचे एकमत असून कायदेशीर बाबी पूर्ण करूनच टिकणारे आरक्षण देण्यासाठी राज्यातील सर्वच पक्ष एकत्रितपणे काम करायला तयार आहेत. राज्यातील शांतता तथा कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवावी, असे आवाहन करण्यात आले. तसेच उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांनीही सहकार्य करावे व आपले उपोषण मागे घ्यावे, असे आवाहन करणारा ठराव सर्वपक्षीय बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

### महत्त्वाची बातमी

## लाचप्रकरणी लोकसेवकास दोन वर्षाची शिक्षा

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** ऊमरी येथील न्यायालयात बेलीप पदावर असलेल्या लोकसेवकानी तक्रारदार याचे निघालेले वारंट मध्ये अटक न करण्यासाठी लाचेची रक्कम स्विकारल्या प्रकरणी बुधवारी ता.(एक) येथील जिल्हा सत्र न्यायालय-२चे न्यायाधीश वाय.एम.एच.खादरी यांनी दोन वर्षाची शिक्षा सुनावली आहे.

न्यायालयाने दिलेल्या माहितीनुसार, उमरी येथील न्यायालयात बेलीप फदावर असलेले अरोपी एन.एस.भारती यांनी तक्रारदार यांचे निघालेले पोटगी वारंटमध्ये अटक न करण्यासाठी वारंटचा विनातालीम रिपोर्ट पाठवण्यासाठी व दोन महिन्याची मूद्दत वाढवून मिळवण्यासाठी ता.(चार) आगस्ट २०१७ रोजी पंचासमक्ष (एक हजार रूपये) लाचेची रक्कम स्विकारले. लोकसेवकास मिळणारे वैध परीश्रमिका शिवाय पारीतोषण व बक्षीस म्हणून स्वताचा आर्थिक फायदा करून गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन केल्याने उमरी पोलीसांनी भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमानुसार गुन्हा दाखल केला आहे. खटल्याची सूनावनी येथील न्यायालयात बूधवारी करण्यात आली. यावेळी पोलिस व सरकारी वकीलाने तपासलेल्या साक्षीनुसार अरोपीस दोन वर्षाची शिक्षा व एक हजार रुपये दंड आणि दोन हजार रुपये दंड न भरल्यास दोन महिने वाढिव शिक्षा सुनावली आहे.सरकारी पक्षाकडून सौ.अनूराधा डावकरे अतिरिक्त सरकारी अभियोक्ता यांनी काम पाहिले.




# बोरीत मराठा समाजाचा रास्ता रोको

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** तालुक्यातील बोरी व पंचक्रोशीतील विविध गावांमधील मराठा बांधवांच्या वतीने बुधवार दि. १ नोव्हेंबर रोजी मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी जिंतूर- परभणी महामार्गावर कौसडी फाटा येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. बोरी येथील जिजाऊ चौक येथे उपोषण स्थळी सकाळी ९ वाजल्यापासून बोरी व परिसरातील मराठा बांधव रस्ता रोको आंदोलनासाठी गर्दी करत होते. यानंतर सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास जिजाऊ चौक येथून मेन रोड मार्गे बस स्थानक व परभणी रोड मार्गे आंदोलक मराठा बांधव जिंतूर परभणी महामार्गावरील कौसडी फाटा येथे आले. यादरम्यान सदर मार्गावरून चालताना मराठा बांधवांनी आरक्षणाच्या मागणीसाठी तसेच मनोज जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ मोठ्या घोषणाबाजी केल्या. सकाळी साडेदहा वाजल्यापासून ते एक वाजेपर्यंत रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. रस्त्याच्या दुतर्फा वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. रास्ता रोको आंदोलना दरम्यान विश्वनाथ मगर, पत्रकार गजानन चौधरी, शरद ठमके, आशाताई गायकवाड, मुंजा घाटूळ, अभिजीत चौधरी, शरद चौधरी, जावेद कुरेशी यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन विशाल देशमुख यांनी तर आभार प्रदर्शन ओमकार चौधरी यांनी केले. सदर मनोगतामध्ये सर्व मान्यवरांनी मराठा समाजाच्या अधोगतीला व आरक्षण न मिळण्यास सर्व प्रमुख पक्ष व पक्षाचे सर्व प्रमुख पुढारी जबाबदार असल्याचे सांगितले. आता तरी सर्व पक्षांनी एकत्र येऊन मराठा समाजाला आरक्षण देऊन न्याय मिळवून द्यावा अशी अपेक्षा व्यक्त केली. मराठा समाजाला आरक्षण न मिळाल्यास हे आंदोलन अजून तीव्र करण्याचा इशारा मनोगत व्यक्त करताना देण्यात आला.

जिंतूरचे तहसीलदार राजेश सरवदे, नायब तहसीलदार प्रशांत राखे, बोरीचे मंडळ अधिकारी प्रसाद साखरे, तलाठी बोरकर, पोलीस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक सरला गाडेकर यांनी आंदोलन स्थळी भेट देऊन समाज बांधवांशी चर्चा केली. मराठा समाजाच्या वतीने प्रशासनास आरक्षणाच्या मागणीचे व जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ निवेदन देण्यात आले. यानंतर रास्ता रोको आंदोलन स्थगित करण्यात आले. याप्रसंगी बोरी व पंचक्रोशीतील विविध गावांमधील मराठा समाजाचे तरुण व नागरिक यांनी पुढाकार घेतला.








# कोण कुणाकडे राहतंय ?

आधुनिक केसरी

घराला, देहाला देवाचे मंदिर म्हणणे आणि त्याप्रमाणे आचरण करणे ही गोष्ट वाटते तेवढी सोपी नाही. त्यासाठी मनाला तशी सवय लावावी लागेल. आजच्या संगणकाच्या भाषेत सांगायचे झाले तर आपल्या मनाचे तसे ' प्रोग्रॅमींग ' करावे लागेल. पूर्वी आपल्या भारतीय संस्कृतीत जे चार आश्रम सांगितले होते, ते जीवन आचारण्याच्या दृष्टीने आदर्श असे होते. त्यातून आपल्याला आपल्या पूर्वजांची दूरदृष्टी दिसून येते. ब्रह्मचर्याश्रमात सगळे नियम पाळून गुरुगृही राहायचे, विद्या संपादन करायची. त्या काळात ज्ञान, आरोग्य यांची उपासना करायची.
ही एक प्रकारची साधनाच असायची. ही साधना पुढील आयुष्यात कामी यायची. मग नंतर गृहस्थाश्रम. गृहस्थाश्रमात आपली कर्तव्ये पालन करून समाजाला आणि कुटुंबाला उपयोगी ठरेल अशा पद्धतीने आचरण करायचे. ब्रह्मचर्याश्रमात संपादन केलेल्या विद्येचा, कौशल्यांचा वापर करून सदाचरणाने धन मिळवायचे. अशा पद्धतीच्या गृहस्थाश्रम आचरता आला तर त्याला ' धन्य गृहस्थाश्रमः ' असे म्हणायचे. पुढील वानप्रस्थाश्रमात संसारातील आसक्ती हळूहळू कमी करायची. ईश्वरभक्तीत रममाण व्हायचे अशी अपेक्षा होती. त्याप्रमाणे आपले पूर्वज हळूहळू मनाने विरक्ती स्वीकारीत असत. म्हणजे मग या संसाराच्या मोहमायेतून बाहेर पडणे त्यांना शक्य होई. गृहस्थाश्रम धन्य करून वानप्रस्थ आणि मग संन्यासाश्रम अशी त्यांची वाटचाल होत असे. आजच्या जीवनपद्धतीत हे सगळी आश्रमव्यवस्थाच विस्कळीत झाल्याने माणसाचा गोंधळ उडाला आहे. नात्यागोत्यात, जडात, पार्थिवात अडकलेले त्याचे मन बाहेर यायला तयार होत नाही. अपेक्षा पूर्ण होत नसल्याने होणारे अपेक्षाभंगाचे दुःख फार मोठे असते. सुख सुख म्हणून आयुष्यभर ज्या गोष्टींचा पाठलाग केला त्या सुख देण्यास असमर्थ ठरतात. अशा वेळी माणसाचे मन ईश्वराकडे धाव घेते. आपला जन्म या मातीतला. पण या मातीला आभाळाची ओढ लागते. मोहमायेच्या, नात्यांच्या बेड्या माणसाला या मातीत जखडत असतात. मन मात्र पंख लावून आभाळाकडे उडतअसते. कवी म. म. देशपांडे यांची एक सुंदर कविता आहे. ' अंतरिक्ष फिरलो पण...' या नावाची. त्यात कवी म्हणतो अंतरिक्ष फिरलो पण गेली न उदासी गेली न उदासी. आज माणसाने भौतिक प्रगती खूप केली आहे.





## आनंदी पहाट

# कोणताही योग योगायोगाने येत नसतो

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

भूतकाळात घडलेल्या प्रत्येक घटनेचा, घडामोडीचा संबंध आपण आपल्या वर्तमानातील जीवनाशी जोडण्याचा केविलवाणा प्रयत्न नेहमीच करत असतो. जो गेला तो भूतकाळ होता, त्यांत किती गुरफटून राहायचे, ह्याचे कित्येकवेळा आपल्याला भानच रहात नाही. तो काळ आपण कितीही ठरवला, तरीही विसरूच शकत नाही. खरे म्हणजे भूतकाळात रममाण होण्यापेक्षा वर्तमानातील परिस्थिनुसार भविष्य उज्वल करण्याचा आपण प्रामुख्याने आणि प्राधान्याने विचार केला पाहिजे. आपल्या आयुष्यातील गेलेल्या क्षणांना आपण कितीही ठरवले तरीही विसरू शकत नाही. त्या गतकाळातील आठवणीचा प्रत्येक क्षण आपल्याला काहीवेळा नवी उभारी देत असतो, तर काहीवेळा नैराश्यात देखील घेऊन जात असतो. आपण अनेकदा भूतकाळातून अंतर्मनाने बाहेर पडत नाही आणि वर्तमानातील आनंद मिळवू शकत नाही, केवळ आपल्या नशिबाला आणि भविष्याला दोष देत बसतो.
खरे म्हणजे, नशिबाच्या खेळामुळे नाराज होऊ नये. जीवनांत काहीही झालं तरी उदास होऊ नये. हातांवरच्या रेषांवर कधी भविष्य पाहू नये आणि विश्वासही ठेवू नये. कारण, भविष्य तर त्यांना देखील असते, ज्यांना हातच नसतात. आपल्या नशिबातले योग आपणच आणायचे असतात. त्यासाठी हातापेक्षा सकारात्मक विचार आवश्यक असतात. आपले विचार बदलेले तर नशीब बदलतेच. असं म्हंटले जाते, कि प्रारब्धातील भोग आणि नशिबातील योग कधीही चुकवता येत नसतात. परंतू ह्या दोन्हींचा संबंध आपल्या विचार, वर्तन आणि व्यवहारांशी निगडीत असतो.




आधुनिक केसरी

**अनाहत नाद | अंतरीचा ||**
आता मज नाही | चिंता संसाराची ||
भेटली जीवाची | विठामाय ||
भोगल्या यातना | भोगली प्राक्तने ||
निमाली दर्शने | ज्ञानाईच्या ||२||
एकांती मनाला | मौनाचा आधार ||
तुकोबाचा सार | अभंगात ||३||
आठवता रूप | तुझे पांडुरंगा ||
यातनांच्या रांगा | भस्म होती ||४||
समाधिस्थ होता | कोण घाली साद ||
अनाहत नाद | अंतरीचा ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण


आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

मृत्य पावला आपण ।मतेचा घेतला प्राण ।
दुःख भोगिलें दारुण ।गर्भवासीं ॥४३॥
तथापी सुकृतेंकरूनी ।मार्ग सांपडला योनी ।
तऱ्हीं आडकला जाउनी ।कंठस्कंदीं मागुता
॥४४॥तये संकोचित पंथीं ।बळेंचि वोढून
काढिती ।तेणें गुणें प्राण जाती ।बाळकाचे ॥

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

जग जीवन से अलग है, बीस कला जेहि माँहि । सद्गुरु प्रभु के रुप हैं, शब्द कला गुण जाँहि ।।०१।।(स्वर्वेद षष्ठ मण्डल चतुर्थ अध्याय) ०६/०४ पृ. क्र. ९२३
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
या ओळींमध्ये ग्रंथकार सद्गुरूंच्या व्यक्तित्वाच्या विशेषतेचे वर्णन करीत आहेत. सद्गुरू संसारी जीवांहून भिन्न, विशेष पुरुष असतात. त्यांच्यामध्ये दिव्य वीस विज्ञानमय चेतन कौशल्यं असतात, जी इतर सांसारिक आत्मे, संत, महंत तसेच जीवन्मुक्त महात्म्यांमध्ये अजिबात असत नाहीत. सद्गुरू व्यक्त रूपात परमात्मा स्वरूपच असतात आणि त्यांच्यामध्ये परब्रह्माचे सर्व ज्ञान-विज्ञान तसेच साधर्म्य विद्यमान असतात. सद्गुरूंचे व्यक्तित्व सर्वोपरी आहे, कारण ते आपल्या कृपादृष्टीने तसेच उपदेशा द्वारे अनेक संत, महंत तसेच जीवन्मुक्त महात्मा बनवतात. परीस आपल्या स्पर्शाने लोखंडाचे सोने बनवतो पण तो त्या लोखंडाहून भिन्न गुण असलेला आणि श्रेष्ठ असतो. त्याचप्रमाणे सद्गुरू पद सर्वोपरी, सर्वश्रेष्ठ आहे.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## काव्य-चरितावली

आधुनिक केसरी

पुष्प ५०वे




अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

धाकट्या राम मंदिराची स्थापना केली ।भक्तजनांची मोठीच सोय झाली । पारीवारिक मंडळी नव्या खोल्यात राहू लागली । चिंतुबुवांना महाराजानी गोंदवल्यास बोलविले ।। १ ।। सगळेच वातावरण बदलून गेले । लोक श्रीमहाराजांच्या सोबत रमून गेले । कष्टाची, मेहनतीचे काम करू लागले । खाती मिळून भाकरी बाजरीची, आमटी तिखट ।।२ ।। वैदिक, विद्वान विप्राना पाचारण केले । रुद्र स्वाहाकार, गायत्री पुरश्चरण करविले । या विद्वानांना सन्मानित केले । भक्तजन होती अन्नछत्रात तृप्त ।। ३ ।। एकदा फार मोठी विद्वात सभा झाली । सखोल चर्चेत चांगलीच खडाजंगीही झाली । बोलले पाहिजे आपण महाराजांना जाणीव झाली । सिद्ध होती प्रतिपादन करण्या ।।४ ।।

# साधनांनी जे साधत नाही ते संतसहवासाने साधते

आधुनिक केसरी

अवतारी संत आणि इतर संत यांच्यामध्ये फरक असतो. अवतारी संत हे ज्ञानेश्वर महाराजांसारखे किंवा समर्थांसारखे असतात. ते आपण होऊन येतात, आणि आपले काम झाले की जातात; मग ते राहात नाहीत. संतांनी जगातील राज्ये मिळविली नाहीत. पण त्यांनी स्वतःवर राज्य केले. चमत्कार करणे हे संतलक्षण नव्हे. चमत्कार सहजगत्या होतील तर होवोत, चमत्कार दाखवावा म्हणून संत चमत्कार करीत नाहीत. संतांची निंदा किंवा अपमान करू नये. त्यांची परीक्षाही पाहू नये. कोणाचेही वाईट चिंतू नये. दुसऱ्याचे हित करावे, हितच चिंतावे. उत्तम हित नामावाचून अन्य कशातही नाही. म्हणून अखंड भगवन्नाम जपणे ही संतसंगतच आहे. सद्विचार ही एक सत्संगतच आहे. ध्यान, स्मरण, मनन आणि सद्ग्रंथवाचन यांमुळे संतांची गाठ पडून त्यांच्याशी समागम होणे शक्य होईल.
संतसमागमात राहून विषय मागणे हे समागमाचे रहस्य नाही. एकुलत्या एका मुलाने अफूच्या गोळीसाठी हट्ट धरला, तर



आई त्याला ती गोळी देईल का ? जर तिने ती दिली, तर ती खरी आईच नव्हे. त्याप्रमाणे, जो विषयाचे प्रेम देईल तो खरा संत नव्हे. संताला विषयाचे प्रेम असत नाही. इतकेच नव्हे, तर त्याचा माणूस विषयात राहिला तर त्याच्या हृदयाला पीळ पडतो. कुत्रा हाड चघळीत असताना आपल्याच तोंडातले रक्त पिऊन, ते त्या हाडातून येते आहे असे समजतो आणि शेवटी त्यातच मरतो. हे पाहून जितके वाईट वाटेल त्याच्या दसपट, नव्हे अनेकपट, आपण विषयमग्न असलेले पाहून संतांना वाईट वाटते. संतांनी खरे भगवंताला जाणले. जिज्ञासू शिष्य भेटला तर संताला आपले स्वतःचे सार्थक झाले असे वाटते. साधनांनी जे साधत नाही ते संताच्या सहवासात राहिल्याने साधते. मनुष्य जितका निःस्वार्थी तितकी त्याची भाषा व्यापक असते. तुमच्याआमच्या घरातले लोकसुद्धा आपले ऐकत नाहीत, पण संतांची वाणी सर्व जगावर परिणाम करते, कारण ती सर्वव्यापक असते. ती अत्यंत तळमळीची असते. याच अर्थाने श्रुती सनातन आहे. जगाचे कल्याण व्हावे म्हणून ऋषी बोलले, म्हणून त्या वाणीने जगाचे कल्याण व्हायचेच, आणि जगाचे कल्याण व्हावे असे वाटते तोपर्यंत ती वाणी राहायचीच. आहे त्यात समाधान मानणे, कोणाचाही द्वेष मत्सर न करणे, सर्व भगवद्रूप मानणे, निरभिमान राहणे, सदोदित भगवन्नामस्मरण करणे, आणि संत, सज्जन, सद्गुरू यांच्याविषयी पूज्यभाव ठेवणे, या गोष्टी आचरणात आणणे, हाच परमार्थ. यांत कोणती गोष्ट अवघड किंवा खर्चाची आहे ? आम्ही निश्चयाने ती करीतच नाही म्हणून समाधान येत नाही. या गोष्टींप्रमाणे आचरण ठेवले तर समाधान येईलच.

## संत मुक्ताबाई

खरे तर विरक्ती, ज्ञान, भक्ती आणि मुक्ती यांचे मूर्तिमंत स्वरूप घेऊन निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ता जन्माला आली. साक्षात दिव्यत्वाची ही चार रूपे रुक्मिणी आणि विठ्ठलपंतांचे मातृ-पितृत्व धन्य करणारी ! पण हे दिव्यत्व जगाला समर्पित करून मत पित्याला जगाचा निरोप घ्यावा लागला. पोरवयातच निवृत्तीनाथ आणि त्यांच्या भावंडाना संन्याशाची पोर म्हणून वाळीत टाकून त्यांची विटंबना केली, पण हे सारे भोग सोसत ह्या चारही बहिण भावंडानी ब्राम्हविध्येची अखंड

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
गुरुवार, २ नोव्हेंबर २०२३



काकड आरतीमुळे गावागावात भक्तीमय वातावरण पान ६





एकीकडे कोमेजले, दुसरीकडे उमलले... पान ७

# मराठा आरक्षणापेक्षा प्रत्येकाला व्होट बँक महत्त्वाची वाटते : संभाजीराजे छत्रपती

## बैठकांमध्ये वेळ न दवडता सरकारने ठोस पावले उचलावीत

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** महाराष्ट्रात मराठा आरक्षणाचा मुद्दा पेटलेला आहे. सर्वत्र जाळपोळ, बस जाळणे, रास्ता रोको, आंदोलन, उपोषण सुरू आहे. या पार्श्वभूमीवर बुधवारी मुंबईतील सह्याद्री अतिथीगृहात सर्वपक्षीय बैठक बोलवण्यात आलेली. बैठकीला सत्ताधाऱ्यांसोबत विरोधी पक्षांमधील अनेक मंत्री उपस्थित होते. परंतु, स्वराज्य संघटनेचे अध्यक्ष संभाजीराजे छत्रपती मात्र बैठकीला अनुपस्थित होते. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या बाजूला लावलेली त्यांची खुर्ची ही रिकामीच ठेवलेली पाहायला मिळाली. अशातच संभाजीराजे छत्रपतींनी मराठा आरक्षण प्रश्नी बोलावण्यात आलेल्या सर्वपक्षीय बैठकीवर बहिष्कार घातल्याची माहिती मिळत आहे. संभाजीराजे छत्रपतींनी स्वतः यासंदर्भात ट्वीट करुन माहिती दिली आहे. त्यांनी या बैठकीस पोकळ बैठक असे संबोधत राज्य सरकारसह सर्वपक्षीयांवर देखील मराठा आरक्षणापेक्षा प्रत्येकाला आपापली व्होट बँक सांभाळण महत्त्वाचे वाटत असल्याचे टीकास्त्र सोडले आहे.

मराठा आरक्षणाबाबतची कोणतीही बैठक कधीही न टाळणारे



छत्रपती संभाजीराजे पहिल्यांदाच बैठकीला अनुपस्थित राहिल्यानं चर्चांना उधाण आले होते चर्चेचा विषय ठरला होता.

संभाजीराजेंनी ट्वीटमध्ये म्हटले की, मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती दिवसेंदिवस खालावत आहे, राज्यात आत्महत्या होत आहेत, मराठा आंदोलन तीव्र होत आहे. तरीदेखील सरकार केवळ बैठकांचा खेळ करीत आहे. अशा बैठकांमध्ये वेळ न दवडता सरकारने ठोस पावले उचलावीत. केंद्र सरकारनेही केवळ बघ्याची भूमिका न घेता तात्काळ या विषयामध्ये लक्ष घालून मराठा समाजाला आरक्षण द्यावे, हीच आमची अंतिम मागणी आहे.

गेल्या पंधरा वर्षांपासून मराठा आरक्षण चळवळीत सक्रिय असताना कोणत्याही सरकारने समाजासाठी बोलाविलेल्या एकाही शासकीय बैठकीस मी अनुपस्थित राहिलो नाही. दोन वेळेस आरक्षणही मिळाले होते मात्र मागील सरकारच्या घोडचुकांमुळे दुर्दैवाने मराठा आरक्षण रद्द झाले व समाजाचा लढा परत एकदा तीव्र झाला, असे संभाजीराजे ट्वीटमध्ये म्हणाले आहेत.

सध्या आरक्षणाच्या नावाने केवळ पोकळ बैठकांचे सत्र चालू असल्याचे दिसून येत आहे. यातून कोणताही मार्ग निघत नाही अथवा आरक्षण कसे देणार, किती कालमर्यादेत देणार याचा मार्गही सांगितला जात नाही. सर्वपक्षीय मंडळी देखील मराठा आरक्षणाला पाठिंबा देतात, बैठकांना येतात मात्र मार्ग सांगत नाहीत. मराठा समाजाला आरक्षण देणे यापेक्षा प्रत्येकाला आपापली व्होटबँक सांभाळणे अधिक महत्त्वाचे वाटत आहे. त्यामुळे आजच्या बैठकीस मी अनुपस्थित राहण्याचा निर्णय घेतला. समाज आता अशा बैठकांना भूलणार नाही, आरक्षण मिळेपर्यंत लढा सुरूच राहील, असे संभाजीराजे ट्वीटमध्ये म्हणाले आहेत.

# संभल के रहो, सुप्रिया सुळे यांचा अजितदादा गटाला मोठा सल्ला

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार निशाणा साधला आहे. राज्याची कायदा सुव्यवस्था पूर्णपणे ढासळली आहे. देवेंद्र फडणवीस यांनी सर्वच समाजाची फसवणूक केली आहे. त्यांनी गृहमंत्रीपदाचा राजीनामा दिला पाहिजे, अशी मागणी करतानाच भाजप हा पक्ष विश्वासू नाहीये. त्यांनी उद्धव ठाकरेंना फसवले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशीही दगाबाजी केली. आता अजितदादा गटाने सांभाळून राहिले पाहिजे, असा सल्ला सुप्रिया सुळे यांनी दिला आहे. देवेंद्र फडणवीस फसवत आहेत. हे मनोज जरांगे पाटील म्हणाले ते बरोबर आहे. पाटलांना जसा फडणवीस यांनी दगाफटका केला तसा सर्वांनाच केला आहे. या राज्यातील महिलांशीही दगा फटका केला आहे. राज्यात महिला सुरक्षित कुठे आहेत? त्याला देवेंद्र फडणवीस जबाबदार आहेत. एकनाथ शिंदे अपात्र ठरले तर त्यांना विधान परिषदेतून घेऊ असे फडणवीस म्हणाले. म्हणजे शिंदे अपात्र होणार आहे हे त्यांना माहीत आहे. म्हणजे शिंदेंना दगाफटका केला ना? यांना जर शिंदे अपात्र होणार हे माहीत होते तर मग उद्धव ठाकरेंचा पक्ष का फोडला? उद्धव ठाकरेंशी दगाफटका केलाच पण घटक पक्षाशीहा दगाफटका केला. अजित पवार गटाला विनम्र विनंती आहे, कधी तरी एका ताटात आपण जेवलोय. ते शिंदेंना धोका देत आहेत.

# कार्यकर्त्यांनी अडवली शहाजी बापूंची गाडी

## पंढरपुरात मराठा कार्यकर्ते आक्रमक

आधुनिक केसरी न्यूज

**सोलापूर :** मराठा आरक्षणाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारच्या दरबारीदेखील जोरदार हालचाली सुरु आहेत. राज्य सरकारने आज सर्वपक्षीय बैठक घेतली. मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला सरसकट कुणबी आरक्षण द्यावे, अशी मागणी केली. त्यांच्या या मागणीवर आजच्या सर्वपक्षीय बैठकीत चर्चा झाली. यावेळी सरकारकडून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांच्याकडून सविस्तर भूमिका मांडण्यात आली. सरकार मराठा आरक्षण देण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करत आहे. या कार्यात सर्वांनी सहकार्य करावे, अशी भूमिका सरकारकडून मांडण्यात आली. या बैठकीत मनोज जरांगे यांनी सरकारला सहकार्य करावे आणि उपोषण सोडावे, असे सर्वांचे एकमत झाले. सरकार दरबारी एकीकडे घडामोडी घडत आहेत, तर दुसरीकडे राज्यात मराठा कार्यकर्ते आक्रमक होताना दिसत आहेत.

सांगोल्याचे आमदार शहाजी बापू पाटील हे त्यांच्या 'काय झाडी, काय डोंगर, काय हॉटेल' या डायलॉगमुळे प्रचंड लोकप्रिय झाले आहेत. त्यांना सांगोल्यात आदराचं देखील स्थान आहे. ते सत्ताधारी शिवसेना शिंदे गटाचे आमदार आहेत. त्यांच्यासोबत आज अनपेक्षित घटना घडली. मराठा आंदोलकांनी आज त्यांची गाडी अडवली. यावेळी आंदोलक चांगलेच आक्रमक झालेले बघायला मिळाले. मराठा कार्यकर्ते पंढरपुरात चांगलेच आक्रमक झाले. या कार्यकर्त्यांनी आज सांगोल्याचे आमदार शहाजी बापू पाटील यांची गाडी अडवली. मराठा आंदोलकांनी पंढरपूरच्या कराड नाक्यावर शहाजी बापूंची गाडी अडवली. यावेळी शहाजीबापूंच्या गाडीच्या वाहनचालकाने अंगावर गाडी घातल्याचा आरोप आंदोलकांनी केला. आंदोलक शहाजी बापू यांच्या वाहनचालकावर प्रचंड संतापले. त्यांनी वाहनचालकाला शिवीगाळ केली.

आंदोलकांचा रोष पाहता अखेर शहाजी बापू यांना गाडीतून खाली उतरावे लागले. शहाजी बापू यांनी यावेळी आंदोलकांची हात जोडून माफी मागितली. यावेळी आंदोलकांनी शहाजी बापू यांना जाब विचारला. तुम्हाला गावबंदी असताना तुम्ही इथे का आलात? असा सवाल आंदोलकांनी केला. यावेळी शहाजी बापू यांनी आंदोलकांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. ड्रायव्हरला एवढी मस्ती आली. तुमच्यामुळे भीक मागायची पाळी आली, असे आंदोलक शहाजी बापूंच्या वाहनचालकाला उद्देशून म्हणाले.

# विश्वकर्मा योजना बाराबलूतेदारांसाठी आधारवड

## जिल्हा ओबीसी मोर्चाचे अध्यक्ष गणपत पीठ्ठेवाड

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सत्तेत आल्यापासून "सबका साथ सबका विकास " ह्या तत्वाचा गांभीर्याने विचार करून तळागाळातील लोकांपर्यंत विविध योजना पोहचवण्यासाठी प्रयत्न केला आहे. आता नव्याने विश्वकर्मा योजना हि बाराबलूतेदाराच्या विकासाठी सूरू केली आहे. सदरील योजना कारागीरासाठी आधार वड आहे असे प्रतिपादन भाजपा ओबीसी जिल्हा मोर्चाचे अध्यक्ष गणपत पीठ्ठेवाड पोमनाळकर यांनी रविवारी (ता.२९) केले आहे.

शहरातील विश्वकर्मा मंदिरात भाजपा ओबीसी मोर्चाच्या वतीने मन की बात व मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते. व्यासपीठावर जिल्हा सरचिटणीस बाळा साखळकर, सचिव हरीदत्त पाटील हाके, बाबुराव घोरके,जिल्हा उपाध्यक्ष हरीभाऊ



चटलावार,माधव पाटील बटाळकर, संतोष मारकवार, रमेश मटकमवाड, श्रीकांत पाटील किन्हाळकर, साई राठोड, माऊली पाटील चिंचाळकर, विजय प्रेमलवाड, श्याम पाटील, भुंजग पाटील, शिवा जाधव, महेश पाटील, राजू देशपांडे, अविनाश वर्षेवार, गजानन सुर्यवंशी, संभाजी बत्तलवाड, सोनू सुर्यवंशी, बाबू पांचाळ यांची उपस्थिती होती. पिठ्ठेवाड म्हणाले की, भाजप सरकारने अनेक लोकाभिमुख योजना सुरू करुन विकासाचा रथ सातासमुद्रापार नेला आहे. केवळ घोषणा करून न थांबता त्याची योग्य अंमलबजावणी करण्यात यशस्वी झाले आहेत.भविष्यात देशाच नाव उंचावण्यासाठी भाजपाच सत्तेत राहण गरजेचं आहे.

बाराबलूतेदारानी सदरील योजनेचा लाभ घेवून आपल्या व्यवसायाची भरभराटी करावी स्थानिक पातळीवर काही अडचणी आल्यास ओबीसी मोर्चाचे पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधावा असे आवाहन केले आहे. यावेळी उपस्थित मान्यवरांनी सखोल मार्गदर्शन केले आहे. सूत्रसंचलन बालाजी वाघमारे यांनी केले.माधव शिंदे पाटील यांनी आभार मानले आहे. शिबीरास पंचक्रोशीतील बहूसंख्य लाभार्थी उपस्थित होते.

# मणिपूरमध्ये इंटरनेट बंदी वाढवली, समाजविघातक पोस्ट रोखण्यासाठी निर्णय

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** समाजकंटकांकडून व्हायरल होणारे मेसेज, फोटो आणि व्हिडीओ रोखण्यासाठी मणिपूरच्या गृहविभागाने ५ नोव्हेंबरपर्यंत इंटरनेट बंदी वाढवली आहे. येत्या काही दिवसांत ही बंदी मागे घेतली जाईल, असंही आश्वासन मणिपूरचे मुख्यमंत्री एन.बिरेन सिंग यांनी दिले होते. मणिपूरमध्ये चालू असलेल्या हिंसाचाप्रकरणी राज्यातील तरुण, विद्यार्थ्यांनी संयमाची भूमिका घ्यावी, अशी विनंती मुख्यमंत्री सिंग यांनी एका सरकारी कार्यक्रमात संबोधित करताना केली होती. मणिपूर हिंसाचार चिघळत गेल्याने सरकारने इंटरनेट बंदी आणली होती. सप्टेंबर महिन्यात १४३ दिवसांनी ही बंदी उठवण्यात आली होती. परंतु, २६ सप्टेंबरला पुन्हा मोबाइल इंटरनेट डेटा सेवा खंडित करण्यात आली. त्यानंतर, प्रत्येक पाच दिवसांनी ही बंदी वाढवण्यात येत आहे. मंगळवारी गृह विभागाच्या अधिसुचनेनुसार, काही समाजकंटक सोशल मीडियाचा वापर करून द्वेषयुक्त भाषण, व्हिडीओ आणि फोटो प्रसारित



करत आहेत. यामुळे कायदा सुव्यवस्था धोक्यात आली आहे. ही परिस्थिती टाळण्यासाठी इंटरनेट बंदीचे आदेश देण्यात आले आहेत.

३ मे रोजी हिंसाचार सुरू झाल्यानंतर संपूर्ण राज्यात मोबाईल इंटरनेटवर बंदी घालण्यात आली होती. २३ सप्टेंबर रोजी ही बंदी उठवण्यात आली होती. परंतु, दोन तरुणांच्या मृतदेहांच्या छायाचित्रांनंतर विद्यार्थ्यांची सुरक्षा दलांशी झटापट झाली. परिणीम २६ सप्टेंबर रोजी इंटरनेट बंदी पुन्हा लागू करावी लागली.

Contoura Vision
चष्मा नको ?
चष्मा घालवा कायमचा.
डॉ.कांकरिया यांचे
साई सूर्य नेत्रसेवा,अहमदनगर तर्फे



लेसर नेत्र शस्त्रक्रिया शिबीर
'कॉन्टूरा व्हिजन' जगातील सर्वात प्रगत तंत्रज्ञान
मोतीबिंदू ,काचबिंदू , तिरळेपणावर उपचार
दि.१९ नोव्हें.२३, हॉटेल रविराज,बाबा पेट्रोल पंपाजवळ, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)-(सकाळी १० ते १२),
दि.२५ नोव्हे.२३, हॉटेल अन्विता, बीड (सकाळी १० ते १२),
दि.२५ नोव्हे.२३, हॉटेल पार्थ, लातूर (दुपारी ४ ते ६).
विशेष सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया केल्या जातील.
नोंदणी फिस रु.१००
9112288611
8888982222

# मोदींची विरोधकांवर टीका

आधुनिक केसरी

'देशाच्या विकासाच्या वाटचालीत ठरावीक वर्गाचे लांगूलचालन आणि तुष्टीकरणाचे राजकारण हा सर्वात मोठा अडथळा आहे. एक खूप मोठ्या राजकीय वर्गाला सकारात्मक राजकारण अजिबात सुचतच नाही. ते आपल्या राजकीय स्वार्थासाठी देशाच्या एकात्मतेबाबतही तडजोड करू शकतात, अशी टीका पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली. देशाचे पहिले गृहमंत्री आणि उपपंतप्रधान सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती 'राष्ट्रीय एकता दिन' म्हणून देशभर साजरी करण्यात आली. यानिमित्त गुजरातमधील नर्मदा जिल्ह्यातील केवडिया येथील सरदार सरोवरलगतच्या सरदार पटेलांच्या एकात्मता स्मारकाला (स्टॅच्यू ऑफ युनिटी) पुष्पांजली अर्पण केल्यानंतर झालेल्या कार्यक्रमात मोदी बोलत होते.मोदी म्हणाले, की आपल्याला भारताला एक समृद्ध आणि विकसित देश बनवायचा आहे आणि सरदार वल्लभभाई पटेल यांच्याकडून प्रेरणा घेऊन हे ध्येय साध्य करायचे आहे. आपल्या या विकासयात्रेत तुष्टीकरणाचे राजकारण हा सर्वात मोठा अडथळा आहे. देशातील गेली अनेक दशके माजलेला दहशवाद, त्याची भयावहता, क्रौर्य हे लांगूलचालन करणाऱ्या माणुसकीच्या शत्रूंना अजिबात दिसत नाही. देशाच्या शत्रूंसोबत बिनदिक्कतपणे हातमिळवणी करताना त्यांना अजिबात संकोच वाटत नाही. जेव्हा देशाला याबद्दल जाणीव जागृती होईल तेव्हाच आपण आपली विकासाची उद्दिष्टे साध्य करू, असे सांगून मोदी म्हणाले, की देशाची एकात्मता टिकवण्याचा प्रयत्न क्षणभरही सोडता कामा नये. एकतेचा मंत्र आपल्याला सातत्याने आचरणात आणायचा आहे. गेल्या नऊ वर्षांत देशांतर्गत सुरक्षेलाही अनेक आव्हाने निर्माण झाली. मात्र, सुरक्षा दलांनी अत्यंत सक्षमपणे आणि कठोरपणे त्यांचा बीमोड केला असे ते म्हणाले. देशवासीयांना नऊ वर्षांपूर्वी गर्दीच्या, वर्दळीच्या बाजारपेठेत, सार्वजनिक ठिकाणी आणि व्यावसायिक केंद्रात वावरताना धाकधूक वाटत असे असा दावा त्यांनी केला. मोदींनी यावेळी जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणारे अनुच्छेद ३७० रद्द केल्याचा उल्लेख केला. जम्मू-काश्मीरमध्ये लागू असलेले अनुच्छेद ३७० हटवले जाऊन काश्मीरला स्वातंत्र्य मिळेल, असे कोणाला वाटले होते का? पण आज काश्मीर आणि देशामध्ये अनुच्छेद ३७० चा अडथळा दूर झाला आहे. सरदारसाहेब याबाबत खूप समाधानी असतील आणि आशीर्वाद देत असतील असा दावा त्यांनी केला.

# बीड जिल्ह्यात कारखानदाराचे इलू-इलू ?



राम कुलकर्णी,
संपर्क 9422742577

आधुनिक केसरी

**बीड जिल्ह्याच्या राजकारणात नविन प्रयोग पहायला मिळत असून ऊस उत्पादक शेतकऱ्याला किती भाव द्यायचा? यासाठी सारेच कारखानदार एकत्र येवुन त्यांच्यात इलु-इलु सुरू असल्याचं लक्षात आलं. विशेष म्हणजे एरवी एकमेकांचे तोंडही न पाहणारी मंडळी भावाच्या बाबतीत एक झाली हे नवलच. साधारणत: 2400 रूपये प्रतिटन भाव देण्यासाठी आमचं ठरलं या भूमिकेत सद्या सारेच कारखानदार एका मांडवाखाली आले पण शेतकऱ्यांना मात्र जो देगा उसका भला या उक्तीप्रमाणे मुक्त स्वातंत्र्य दिसतं. वर्तमान स्थितीत यंदा पडलेला पाऊस अत्यल्प झाल्याने ऊसाच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणावर घट झाली असून एकरी 30 ते 35 टन ऊस होऊ शकतो. शिवाय उत्पादन कमी होऊ शकतं. यापेक्षा पुढच्या वर्षी तर कारखानदारावरच नांगर फिरू शकतो.**

कारण 15 टक्के ऊससुद्धा रहाणार नाही हे तितकंच खरं. काही काळी जो बीड जिल्हा ऊस तोड कामगारांचा म्हणुन ओळखल्या जायचा तो जिल्हा अलिकडच्या काळात ऊस पुरवठा म्हणून ओळखला जातो. कारण नाही म्हटलं तरी 50 लाखाच्या आसपास टनात उत्पादन जिल्ह्यात होवु लागलं. वास्तविक पहाता ऊसाच्या प्रश्नावर जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी मरण यातना भोगलेल्या आहेतच. कारण जेव्हा ऊस जास्त तेव्हा कारखाने कमी अशी परिस्थिती होती. अनेकदा ऊसाच्या प्रश्नावर राजकारण झालं. ज्याचं मतदान त्याचा ऊस गाळप होणार असे चटके देखील बसले. एव्हाना एक एकर ऊस गाळपासाठी महिना महिना कारखानदाराच्या दारात जावुन उंबरठे झिजवावे लागले. पण ही सारी परिस्थिती आता बदलली असुन यंदा तर ऊस उत्पादकांच्यासाठी सोन्याचे दिवस नव्हे तर स्वाभिमानाचेही दिवस आले. कारखानदारालाच आता शेतकऱ्यांचे उंबरठे झिजवावे लागले असुन ऊसाच्या फडात चेअरमनच्या गाड्या असं चित्र आता समोर आलं. यंदाचा गाळप हंगाम तसं पाहता साखर कारखानदारासाठी फार मोठे आवाहन म्हणावे लागेल. मुख्य कारण कमी पडलेला पाऊस.जुन, जुलै, ऑगस्ट एक दोन पावसाचा अपवाद सुटला तर पाऊसच पडला नाही. सप्टेंबरला थोड्या फार पावसावर ऊसं टिकुन राहिले. पण सद्य स्थितीत नद्या, नाले, धरणे, विहीरी 100 टक्के कोरडे. ज्या धरणावर ऊसाचं उत्पादन घेतल्या जातं त्यापैकी मांजरा आणि माजलगाव जायकवाडी धरण आज तळाला गेले आहेत. पावसाच्या थेंबावरच ऊसाचं उत्पादन टिकुन राहिलं पण मागच्या एक महिन्यापासुन पाण्याचा थेंब नाही. एक तर उत्पादनात वाढ झाली नाही आणि आता पाण्याअभावी घट होणार. म्हणजेच यंदा कारखान्याचे गाळप दोन महिन्यापेक्षा जास्त होईल का? यातच शंका वाटते. आता बाहेरच्या साखर उद्योगाचं लक्ष्य बीड जिल्ह्याच्या ऊसाकडे आहे. धाराशिवचा एच. पी. उद्योग एक महिन्यापुर्वीच जिल्ह्यात ऊसाच्या फडात घुसला असुन तीन हजार काटा पेमेंट देवुन वाहतुक सुरू झाल्याची चर्चा कानावर येते. मांजरा आणि रांजणी यांची वाहने देखील जिल्ह्याच्या दिशेने धावू लागली. बीड जिल्ह्यात खासगी कारखानदाराचे पेव फुटले पण त्या अगोदर अंबा साखर कारखाना, माजलगाव सहकारी साखर कारखाना, छत्रपती साखर कारखाना, जयभवानी गेवराईचा कारखाना एकुण चार सहकारी तत्वावर कारखाने ज्याचे गाळप सुरू होतंय. याशिवाय येडेश्वरी खासगी कारखाना, जय महेश कारखाना, गंगामाऊली केजचा शुगर कारखाना एकुण तीन खासगी उद्योग शिवाय गंगाखेड शुगर, सायखेडा, गेवराई जवळचा समर्थ, शंभु महादेव, त्याहुन अधिक सांगायचं झालं



तर नॅचरल शुगर आणि मांजरा उद्योगाचे कारखाने शिवाय पानगावचा कारखाना हे सारे कारखाने बीड जिल्ह्यात ऊस घेवुन जाण्यासाठी येतात. एवढंच नाही तर मागच्या दोन वर्षात उत्पादन जास्त झाल्यानंतर कर्नाटक,गुजरात आदी राज्यात देखील बीडातला ऊस गेला. पण यंदा ऊसाचे उत्पादनच जिल्ह्यात कमी असल्याने घेवुन जाण्यासाठी स्पर्धा लागली पण जिल्ह्यातले कारखानदार शेतकऱ्यांना ठराविक भाव देण्यासाठी त्यांच्यात सुरू झालेले इलु-इलु यातुन मतलबासाठी पुढारी सारे कसे एकत्रित येतात? हे गुपित उघडं पडताना दिसलं. तुम्ही बघा, जय भवानीचे अमरसिंह पंडित, माजलगावचे आ.प्रकाशदादा सोळुंके, छत्रपतीचे मोहन जगताप, केजचे अशोक पाटील, अंबाचे रमेश आडसकर, येडेश्वरीचे बजरंगबप्पा सोनवणे, किंवा इतर साखर उद्योगाशी संबंधित पुढारी एरवी एकमेकांचे तोंड देखील पहात नाहीत. पण यंदा ऊस उत्पादक शेतकऱ्यांना जास्त भाव देण्याची वेळ आली असताना या पुढाऱ्यांमध्ये 2400 रूपये प्रति टन देण्यासाठी सुरूवातीला इलु-इलु झालं आणि आता रूपांतर लव्ह मॅरेजमध्येच झालं म्हणायला हरकत नाही. या मंडळींनी आपण एकत्रित येऊ आणि ऊस उत्पादकांना एवढा भाव देऊ असं फोनाफोनी करत एक विचार केला. त्यानंतर एखाद्या कारखान्याला 100-200 द्यायचे असेल तर उत्पादनाच्या प्रमाणात देवु शकतात असंही ठरल्याचं कळतं. गंमत बघा, बाहेरचे कारखाने जर जिल्ह्यात येवुन तीन हजाराचे भाव देवु लागले आणि जिल्ह्यात 2400 रूपये भाव म्हणजेच ऊस उत्पादकाचं प्रति टन 500 रूपये नुकसान याला जबाबदार कोण? वास्तविक पहाता जो जास्त भाव देणार त्यालाच ऊस शेतकरी घालणार असा प्रयोग यंदा होवु शकतो पण या साऱ्या मंडळींनी स्वतःच्या स्वार्थासाठी एकमताने साखर उद्योगात काढलेला सुर शेतकऱ्यांच्या निश्चित फायद्याचा नाही. नॅचरल शुगर त्यांनी देखील अद्याप भावाच्या संदर्भात तोंड फोडलेले नाही. मांजरा काय देतोय? याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत. याहुन अधिक खात्रीची माहिती मिळते की केवळ जिल्ह्यातच नव्हे तर लातुर, बीड, धाराशिव, जालना, संभाजीनगर, सर्वत्रच एक भाव देण्यासाठी विचारविनिमय सुरू असल्याची चर्चा कानावर पडते. या पुढाऱ्यांचं लव्ह मॅरेज झालं. पण त्यात मरण मात्र शेतकऱ्यांचं आलं असं म्हणायला हरकत नाही. साखरेत गोडवा गुळाचा वाढला कारण यंदा बीड जिल्ह्यात नाही म्हटलं तरी सात ते आठ गुळ उद्योग ज्याला मिनी कारखानदारीच म्हणता येईल. विशेषतः माजलगाव तालुक्यात अत्याधुनिक गुळाचे उद्योग युवा उद्योजक ओंकार खुरपे यांच्यासारख्यांनी चालु केल्याचे बोलल्या जाते. अर्थात गुळ उद्योग कारखानदार देखील मोठ्या प्रमाणावर गाळप करू शकतात. त्यांच्या रूपाने भावाची स्पर्धा लागु शकते. खरं तर शेतकऱ्यांनी घाई करता कामा नये. पाण्याचा प्रश्न असला तरी कोण भाव जास्त देतो? यावर नजर ठेवायला हरकत नाही. आता कारखानदारी मोठ्या प्रमाणावर वाढलेली आहे. पुढच्या वर्षी एक दोन कारखाने नव्याने गाळपास येतील. घाटसावळीचा एच.पी.उद्योग हा कारखाना देखील चालु होवु शकतो. त्यामध्ये ऊस गाळपाची चिंता आता मुळीच शेतकऱ्यांना राहिली नाही. कितीही ऊसाचे क्षेत्र लागवड झाले तरी कुणाचाही ऊस गाळपाअभावी राहु शकत नाही. पण दुर्दैवाने पाऊस कमी म्हणुन उत्पादन घटले हे मात्र नक्की. प्रश्न हाच पडतो की हे बिचारे पुढारी राजकारणात कधी एकत्र दिसत नाहीत. नव्हे तर एकमेकांचे तोंड पहात नाहीत. मग शेतकऱ्यांच्याच नशिबाला ही मंडळी इलु-इलु करत एकत्र येणं म्हणजे खऱ्या अर्थाने उत्पादक शेतकऱ्यांचं दुर्दैव म्हणावे लागेल. काही कारखानदार एकमेकाला बोलत नसले तरी कृषी अधिकाऱ्यांमार्फत परस्परांमध्ये संवाद साधुन 2400 रूपये देण्यासाठी एकरूप झाल्याची चर्चा कानावर पडल्याने जो तो स्वार्थासाठी कसा जगतो? यातुन हे पुढे येतं. यंदा आहे तेवढं तरी उत्पादन पुढच्या वर्षी तर सहकारी साखर कारखाने एकही चालु शकणार नाहीत तशी परिस्थिती राहिल. अपवाद जिल्ह्यात एखादाचा कारखाना थोडफार गाळप करेल. कारण 15 टक्के ऊस उत्पादन कुठेच दिसणार नाही हे मात्र नक्कीच.

# अंहकार, अज्ञानातून जाग येणे हितकारक




गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**जीवनात झोपेतून लवकर जाग येणं जसं हितकारक असत तितकंच हितकारक अंहकार, अज्ञान, गैरसमजुतीमधून जाग येणं अत्यंत महत्त्वाचे असुन जीवन हितार्थ आहे. जाग ही जाग असते आणि योग्य वेळी जाग आली तर हित झाल्याशिवाय राहत नाही. झोपेतून लवकर जाग आली तर दिवस प्रफुल्लित जातो. अहंकार, अज्ञान, गैरसमजातून योग्य वेळी जाग आली तर लाभच लाभ, होतो अज्ञानाच मळभ नष्ट होत आणि हिच जाग उशीराने आली तर मग मात्र सगळ नुकसानदायकच ठरतं. म्हणून योग्य वेळी आलेली जाग ही लाभकारी असते तर उशिराने जाग आली तर अहित झाल्याशिवाय राहत नाही आणि अहित झाल्यावर पश्चात्ताप होऊन काही अर्थ नसतो.**

शेवटी प्रत्येक विषयाच्या अनुषंगाने आपलं हित पाहता आलं पाहिजे. म्हणून जीवन हितार्थ आपल्याला जागेची योग्य जाणीव असणं गरजेचं आहे. जाग ही लवकरात लवकर आलीच पाहिजे. किमान प्रचंड अहित होण्या अगोदर तर ती नक्कीच आली पाहिजे. या ठिकाणी आपण चुकलो तर मग मात्र उशिरा आलेली जाग ही आपल्या पदरात नुकासानासह पश्चात्ताप टाकते. साधारणतः आपण जर सकाळी लवकर उठलो तर आपलं आरोग्य उत्तम राहुन दिवस चैतन्य पुर्ण जातो आणि उशीराने उठलो तर मग मात्र आळस, पुर्ण कंटाळवाणा दिवस जातो. आता हे दोन परस्परविरोधी परिणाम आहेत आपण कोणता उपाय स्वीकारतो त्या नुसार परिणाम आपल्या आयुष्याभर आपल्या पदरात पडतात. याच प्रमाणे अंहाकार हा अवगुण व मानवी विकार आहे. जीवनातील कोणत्याही क्षेत्रातील करिअरमध्ये किंवा आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यावर अंहाकार प्रकाट झाला आणि अशावेळी आपण जागृत झालो नाही तर मग मात्र अंहाकार आपलं आतोनात नुकसान करूनच थांबणार या मध्ये शंका नाही. नुकसान झाल्या नंतर आपल्या हे लक्षात येऊन काही अर्थ नसतो. आपल्या अंहकारा मुळ आपलं एवढं नुकसान झाल आहे याची जाणीव अंहकार आपल्याला होऊ देणार नाही हे पण वास्तव आहे.मुळत सत्य मान्य न करणं हेच अंहकाराच मुळ आहे .साधा सरळ सोज्वळ संयमी निस्वार्थी स्वभाव आणि सात्विक वृत्ती सदैव जागृत असेल आणि सत्याच्या मार्गावर मार्गक्रमण असेल तर अंहकार उत्पान होणार नाही आणि जरी कळत न कळत तो निर्माण झाला तरी आपल्याला लवकरता लवकर जाग आली पाहिजे. हेच आपल्याला साठी हितकारक आहे. त्याच प्रमाणे अज्ञान, आणि गैरसमज हे पण आपल्या जीवनात बळावले तर नक्कीच आपलं जीवन प्रभावित करू शकतात आणि आपलं आतोनात नुकसान करूनच थांबतात म्हणून अज्ञान हे अनंत समस्यांचे मूळ व भव दुःखाचे माहेर घर असते. आणि याच घरातुन आपण बाहेर पडल पाहिजे . गैरसमज तर महाघातक असतो तो मनात नको असलेले विषय साठवून त्याच क्रोधात रुपांतर करणयाच आणि क्रोध अनावर झाला कि त्याचे वाईट घटनेत परिवर्तन घडवण्याची स्थिती निर्माण करतो.म्हणून एकंदरीत झोप असेल किंवा अंहाकार ,अज्ञान ,गैरसमजातुन लवकरात लवकर जाग होता आलं पाहिजे ज्याला




लवकर जाग आली त्याच नक्कीच हित झाल्याशिवाय राहणार नाही आणि कोणत्याही अहितकारक परिणामांना सामोरे जाण्याची गरज भासणार नाही.महणुन सदैव या विषयामध्ये योग्य वेळी जागृत होण उत्तम हितकारक असत. लवकर जाग येण्यासाठी सर्व विघातक शक्ति पासुन दुर राहण्यासाठी आपण आपली सात्विक वृत्ती जोपसाण गरजेचे आहे आणि संत महंत यांची शिकवण व आध्यात्मिक ज्ञान वृत्ती या मार्गावर मार्गक्रमण केल्याने आपण सदैव योग्य वेळी जागृत होणार आपल्याला योग्य वेळी जाग येऊन आपलं आयुष्य सार्थकी लागणार या मध्ये शंका नाही म्हणून जाग कोणतीही असो कोणत्याही क्षेत्रातील असो अथवा परिस्थिती मधील असो लवकारात लवकर आली तर लाभदायी ठरेल आणि उशीराने आली तर मग मात्र पश्चात्ताप कारक ठरेल . जीवनात योग्य वेळी योग्य पद्धतीने जाग येण्यासाठी व जीवनातील अंहकार, अज्ञान, गैरसमज गैरसमजुती मधून बचाव होण्यासाठी अध्यात्मिक ज्ञान वृत्ती वाढली पाहिजे त्याच बरोबर आपल्या जीवनात आध्यात्मिक ज्ञान असलं पाहिजे. तेंव्हाच आपलं हित होईल अन्यथा अहित झाल्याशिवाय राहणार नाही म्हणून जीवन हितार्थ आध्यत्मिक ज्ञान मार्ग स्वीकारला पाहिजे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# चंद्रपूरातील रॅन्चोंची आ. जोरगेवार यांनी घडवली फडणवीस यांच्याशी भेट

## अकरा युवकांनी मिळून बनविली हायड्रोजन कार, सरकार करणार मदत

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** आणि यवतमाळ जिल्हातील 11 युवकांनी मिळून हायड्रोजनवर चालणारी कार तयार केली केली. या युवकांना प्रोत्साहन देण्यासाठी श्री माता महाकाली महोत्सवात त्यांची कार ठेवण्यात आली होती. तर आमदार किशोर जोरगेवार यांनी या युवकांची मुंबई येथे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी भेट घडवून आणली आहे. ना. फडणवीस यांनीही यावेळी युवकांचे कौतुक करत शासन त्यांना मदत करेल असा विश्वास दिला आहे.

यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांच्या सह कारची निर्मिती करणारे हर्षन नक्षीने , साईल काकडे, प्रज्वल जमदाडे, जय विधाते, दिपक मालेकर, वैभव मांडवकर यांची उपस्थिती होती.

चंद्रपूर आणि यवतमाळ जिल्हातील वणी येथील 11 युवकांनी मिळून हायड्रोजनवर चालणारी अत्याधूनीक कार तयार केली आहे. या कारमध्ये सुरक्षा संसाधनापासून सर्व लक्झरी सुविधा उपलब्ध आहे. दोन वर्षाच्या परिश्रमा नंतर स्वखर्चातून या युवकांनी ही कार तयार केली आहे. टायर आणि काच वगळता कारसाठी वापरण्यात आलेले सर्व उपकरणे त्यांनी तयार केली असल्याची माहिती या युवकांनी दिली आहे. सदर कार एक किलो हायड्रोजनवर 250 किमी चालत असल्याचा दावा या युवकांनी केला आहे. तसेच ही कार अद्यावत AI तंत्रज्ञानावर आधारित चालक विरहीत कार असल्याचेही त्यांनी सांगीतले आहे.

दरम्यान आता त्यांना सदर कार रस्त्यावर उतरविण्यासाठी शासनाची मदत हवी आहे. त्यामुळे यासाठी आमदार किशोर जोरगेवार यांनी प्रयत्न सुरु केले आहे. चंद्रपूरात आयोजित श्री माता महाकाली महोत्सवातही सदर कार ठेवण्याची संधी आमदार किशोर जोरगेवार यांनी या युवकांना उपलब्ध करुन दिली होती. यावेळी त्यांनी या युवकांचे कौतुक करत शक्य ती सर्व मदत करण्याचे आश्वासन दिले होते. तर आता त्यांनी या युवकांची उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी भेट घडवून दिली आहे. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कारची पाहणी करत संपूर्ण माहिती जाणून घेतली. भारताकरिता सर्वाधिक आवश्यकता आहे अशा प्रकारचे तंत्रज्ञान या कारमध्ये वापरण्यात आले आहे. या कारमुळे प्रदुषण कमी होणार असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले असून या कारला रस्त्यावरती आणण्यासाठी सरकारच्या वतीने प्रयत्न केल्या जातील असा विश्वास यावेळी त्यांनी व्यक्त केला आहे.

# एसएफआय-अभाविपच्या कार्यकर्त्यांमध्ये हाणामारी

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** पुण्यातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात दोन विद्यार्थी संघटनांमध्ये राडा झाला आहे. स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया  आणि अखिल भारतीय विद्यार्थी परिषद या दोन विद्यार्थी संघटनांच्या कार्यकर्त्यांमध्ये हाणामारी झाली असल्याची घटना समोर आली आहे. यामध्ये दोन्ही बाजूचे काही कार्यकर्ते जखमी झाले आहेत. स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया अर्थात एसएफआय या संघटनेकडून विद्यापीठात संघटनी सदस्य नोंदणी सुरू होती. त्यावेळी अभाविप आणि एसएफआयच्या कार्यकर्त्यांमध्ये वाद सुरु झाला. अभाविपने आमच्या सदस्य नोंदणीत अडथळा आणल्याचा आरोप एसएफआयने केला आहे. तर, अभाविपने एसएफआयचे कार्यकर्ते बळजबरीने सदस्य नोंदणी करत असल्याचा आरोप केला.  या हाणामारीत दोन्ही बाजुचे कार्यकर्ते जखमी झाले आहेत. पुणे विद्यापीठातील हाणामारीचा व्हिडीओ समोर आला आहे. या व्हिडीओनुसार,  एसएफआयच्या कार्यकर्त्याला अभाविपचे कार्यकर्त्यांनी खाली पाडून मारताना दिसत आहेत. तर, एका अभाविपच्या कार्यकर्त्याला एसएफआयचे कार्यकर्ते काठीने मारहाण करताना दिसत आहेत. दरम्यान, दोन्ही बाजूने पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवण्यात आली आहे. बुधवारी सकाळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया (एसएफआय)ची सभासद नोंदणी सुरू होती. यावेळी अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (अभाविप)च्या गुंडांनी अचानक येऊन एसएफआयच्या कार्यकर्त्यांवर हल्ला केला असल्याचा आरोप संघटनेचे राज्य सचिव रोहिदास जाधव यांनी केला आहे. या हल्ल्यात एसएफआयचे राज्य अध्यक्ष आणि केंद्रीय कमिटी सदस्य सोमनाथ निर्मळ, शहर सचिव अभिषेक शिंदे, गणेश जानकर या कार्यकर्त्यांना मार लागला आहे. इतरही कार्यकर्त्यांना सुद्धा मुका मार लागला आहे. गुंड प्रवृत्तीची अभाविप कायम असे हिंसक कृत्य करत आली आहे. त्यांनी त्यांच्या गुंड संस्कृतीची पुनरावृत्ती केली आहे. काहीही कारण नसताना, शांततेत एसएफआयचा सभासद नोंदणी कार्यक्रम सुरु असताना हा हल्ला केला गेला. अचानक एसएफआयच्या कार्यकर्त्यांना मारहाण केली गेली असल्याचे रोहिदास जाधव यांनी म्हटले.

# जायकवाडीतील मृतसाठा वापरा; पाणी सोडण्यास भाजपचा विरोध


आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** जायकवाडी धरणासाठी नाशिक आणि नगर जिल्ह्यातील धरणांमधून विसर्गाऐवजी जायकवाडीच्या मृत साठ्यातील पाच टीएमसी पाणी वापरावे, अशी भूमिका मांडत भाजपच्या आमदार देवयानी फरांदे यांनी पाणी सोडण्यास विरोध केला आहे. याच विषयावर अलीकडेच नांदूरमध्यमेश्वर धरणावर आंदोलन करणाऱ्या भाजपच्या येवला विधानसभा मतदारसंघ प्रमुख अमृता पवार न्यायालयात दाद मागणार आहेत. पाणी सोडण्याविरोधात सत्ताधारी भाजपने आक्रमक भूमिका घेतल्याने मंत्रालयीन पातळीवर या अनुषंगाने विचार प्रक्रिया सुरू झाल्याचे सांगितले जाते. सकारात्मक निर्णय झाल्यास जिल्ह्यातील धरणांमधून पाणी सोडावे लागणार नसल्याचे भाजपच्या वर्तुळातून सांगितले जात आहे.जायकवाडीत २६ टीएमसी (२६ हजार दशलक्ष घनफूट) इतका मृतसाठा आहे. समन्यायी पाणी वाटप तत्वाच्या आधारे नाशिक आणि नगर जिल्ह्यातील धरणांमधून ८.६०३ टीएमसी (८६०३ दशलक्ष घनफूट) पाणी सोडण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यात विसर्गात २.६६३ टीएमसी (२६६३ दशलक्ष घनफूट) होणारा अपव्यय समाविष्ट आहे. यापूर्वी अशा परिस्थितीत मराठवाड्यातील मृत साठ्याचा वापर केला गेला आहे. लाभक्षेत्र विकास प्राधिकरणने गंगापूर समुहातून ५०० दशलक्ष घनफूट, दारणा समुहातून २६४३ दशलक्ष घनफूट, मुळा समुहातून २१००, प्रवरा समुहातन ३३६० असे नाशिक व नगर जिल्ह्यातून एकूण ८६०३ दशलक्ष घनफूट पाणी जायकवाडीसाठी सोडण्याची तयारी सुरू केली आहे. त्यास नाशिक व नगर जिल्ह्यातून विरोध होत आहे. पाणी सोडण्याच्या आदेशास तत्काळ स्थगिती देण्याची मागणी आमदार फरांदे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली. फरांदे यांनी २०१८ मध्ये पाणी सोडण्याच्या विरोधात व गोदावरी अभ्यास गटातील त्रुटींच्या विरोधात महाराष्ट्र जलसंपत्ती नियामक प्राधिकरणाकडे याचिका दाखल केली होती. त्यात जायकवाडीच्या मृत साठ्यातन ऊस शेतीसाठी अनधिकृतपणे वापरल्या जाणाऱ्या पाण्याकडे लक्ष वेधले होते. विसर्गाबाबतच्या निकषाचे दर पाच वर्षांनी अवलोकन करायला हवे. खुद्द मेंढेगिरी समितीने तसे म्हटले होते, असा दाखला दिला गेला. त्या अनुषंगाने प्राधिकरणाने दिलेल्या आदेशानुसार गेल्या जुलै महिन्यात राज्य शासनाने गोदावरी खोऱ्याच्या एकात्मिक अभ्यास व नियमन करण्याच्या दृष्टीने अभ्यास गटाची नियुक्ती केली आहे.




महाराष्ट्र Business Katta









# काकड आरतीमुळे गावागावात भक्तीमय वातावरण



संगीता ठलाल
७८२१८१६४८५

आधुनिक केसरी

**महाराष्ट्र ही थोर संतांची, महापुरूषांची भूमी आहे. साऱ्या जगभर महाराष्ट्राला थोर, संतांमुळे, महापुरूषांमुळे ओळखल्या जाते कारण, त्यांनी स्वतः साठी न जगता जनतेच्या भल्यासाठी व समाजासाठी अफाट संघर्ष करून जगले आहेत आजच्या माणसाला माणूस बणवले ते, थोर संत महापुरुष होते. या भूमीत होऊन गेलेले थोर संत समाजासाठी जगताना सुद्धा मुखात विठूरायाचे गोड नामस्मरण करून आपले कार्यक्रम केले आहेत म्हणून कितीतरी अभंग, भजन, गौळणी रचले आहेत व त्याच्या चरणी सर्वस्व अर्पण केले आहेत माता, पिता, सखा मानले.**

त्याची महिमा सुद्धा गायली आहे म्हणून थोर संत जनाबाई म्हणतात की, विठू माझा लेकुरवाळा, संगे गोपाळाचा मेळा असेच निःस्वार्थ व समाजासाठी जगणारे संत सावळ्या विठ्ठलाला आवडत होते म्हणून तो, त्यांच्यात असलेली भक्ती, श्रध्दा,इतरांविषयी प्रेम, पाहून त्यांच्या संकटी समई मदतीला धावुन जात असे.

एवढी महानता त्या थोर संतांमध्ये होती.त्या थोर संताना, महापुरूषांना व सावळ्या विठूरायाच्या चरणी मी नतमस्तक होते. गेल्या कित्येक वर्षापासून या महाराष्ट्र भूमीत काकड आरती करण्याची परंपरा आहे तेही थोर संतांच्या काळापासून तेव्हापासून दरवर्षी आश्विन महिन्याला सुरुवात झाली की, गावागावात, शहरात पहाटेला देऊळात काकड आरती केली जाते, या एक महिन्याच्या कालावधीत शहरातील वातावरण ठीक आहे पण, गावखेड्यातील वातावरण मात्र जरा वेगळे बघायला मिळत असतो.

कारण, गावखेडा शेवटी गावखेडाच आहे म्हणून वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी गावखेड्याची महानता जाणून माणसाला म्हटले आहे की,चल,चल अपुल्या गावाला राहू नको रे शहराला अन्न नाही तर मरशी उपाशी म्हणजेच जे,गावखेड्यात आहे ते कदाचित शहरात नसावे.हीच महानता आणि भक्तीमय वातावरण आज गावखेड्यात बघायला मिळत आहे. ज्या दिवसांपासून काकड आरतीला सुरूवात होते



त्या दिवसांपासून गावातील महिला वर्ग भल्या पहाटे उठून सडा,रांगोळी टाकतात त्यांच्यात जरा वेगळाच आनंद बघायला मिळत असतो एवढेच नाही तर काकड आरतीसाठी देऊळात जातीभेदाचा भेदभाव केल्या जात नाही ज्यांची विठूरायावर श्रद्धा आहे तो,काकड आरतीमध्ये सहभागी होतोच व भगवंताच्या नामस्मरणात दंग होऊन जातो, भल्या पहाटे टाळ, मृदुंगाचा गजर आणि मुखात हरिनाम असल्याने गाव अगदी त्या गजराने दुमदूमून जातो.ही काकड आरती एक प्रकारची सामाजिक बांधिलकी आहे म्हणायला काहीच हरकत नाही कारण या तरी निमित्ताने लोक एकत्र समजात व भगवंताच्या नामस्मरणात दंग होऊन जातात.

प्रत्येकांच्या मनात सर्वाविषयी असलेली आपुलकी,व भगवतांच्या गोड नामाची आवड बघताना काही क्षणासाठी का होईना पण, बदललेले चांगले चित्र बघायला मिळत असते. कारण ते,गावखेडे आहे या काकड आरतीच्या निमित्ताने गावभर भक्तीमय वातावरण असते तेवढीच आपुलकी व शांत वातावरण बघायला मिळत असतो. एक महिना कसं निघून जाते कळतच नाही आणि शेवटी एक दिवस कार्तीकचा काला करण्यासाठी अख्खे गावभरचे लोक सर्व कामे बाजूला सारून एकत्र येऊन काल्याचे तसेच महाप्रसादाचे आयोजन करतात आणि भक्तीमय वातावरणात तो काल्याचा व महाप्रसादाचा कार्यक्रम सुरळीतपणे पार पाडतात. म्हणून मलाही गावखेड्याविषयी दोन ओळी लिहावे वाटते.गावात असते आपुलकी,गावात असते प्रेम जिव्हाळा, गावात नाही कशाची कमी गावात असते स्नेहबंधनाचा मळा,गावातील नाती,गावातील भक्ती,गावातील आंबिल, चटणी भाकर अन् गावातील माती हे, कायम असते म्हणून काकड आरतीला देऊळात बरेच भक्तजण जमत असतात व मोठ्या श्रध्देने,आनंदाने काकड आरती करून प्रसन्न असतात असे भक्तीमय वातावरण आणि माणसांमाणसात असलेला जिव्हाळा बघून विठूरायाला पुन्हा काय हवंय...? हीच तर त्याची खरी सेवा असते अशीच आपुलकी आणि स्नेह व भगवंतावर श्रद्धा ठेवून प्रयत्न करून प्रत्येक माणसाने जगले तर नक्कीच सर्वाच्या जीवनाचे सार्थक झाल्याशिवाय राहणार नाही.

काकड आरतीची जुनी परंपरा अशीच कायम रहावी, थोर संतांच्या लिहिलेल्या रचनेतून समाज जागृती व्हावी, थोर संताचे कार्य येणाऱ्या भावी पिढीला माहीत व्हावेत तसेच काकड आरतीची आवड निर्माण होऊन या निसर्गाला जाणण्यासाठी त्यांच्यात बुध्दी निर्माण होवो यासाठी हरिच्या चरणी प्रार्थना करते कारण, भलेही आज विज्ञानयुगामुळे माणूस समोर गेला असेल तरी कुठेतरी स्वतःला विसरत चालला आहे. त्यासाठी काकड आरती ही सुध्दा खूप काही शिकायला भाग पाडत असते.गावखेड्याची महानताच तेवढी मोठी आहे की, तेथे लहान, मोठे कार्यक्रम भक्तीमय वातावरणात पार पडत असतात. तशीच ह्य काकड आरतीमुळे गावात भक्तीमय वातावरण बघायला मिळत असते असाच वातावरण कायमस्वरूपी रहावा.

# गर्वाचे घर खाली, पण केव्हा ?



बबन गुळवे
उमरगा, मो.९७३०९३९७३२

आधुनिक केसरी

**या जगात काही व्यक्ती किर्तीवान गुणवान, शीलवान, चारित्र्यवान आणि प्रज्ञावान असतात. त्यांना फार मोठे यश मिळाले तरी ते हुरळून जात नाहीत, पदरात अपयश पडले तरी डगमगत नाहीत. परंतु याच जगात असे खूप लोक आहेत जे फार गर्विष्ठ असतात. त्यांना त्यांच्या नोकरीचा, पदाचा, व्यक्तिमत्त्वाचा, सौंदर्याचा, वस्तीचा, घराचा, जातीचा, समाजाचा आणि कार्याचा फार गर्व असतो. त्यांच्या मुलाने स्पर्धा परीक्षेत यश मिळवले, व्यवसायात गरजेपेक्षा जास्त फायदा झाला, व्यक्ती जवळ खूप पैसा, प्रॉपर्टी आली आणि पदोन्नतीने वरचे मानाचे पद मिळाले की त्यांचा गर्विष्ठपणा वाढतो.**

आपली बरोबरी करणारे या जगात कोणीही नाही, आपणच खरे लायक, आपणच तेवढे चांगले असे त्यांना वाटते.मग ते इतरांना पाण्यात बघतात, दुसऱ्यांच्या चुका शोधतात,वाट्टेल ती नावे ठेवतात. त्यांच्या चालण्यात, बोलण्यात आणि वागण्यात अहंमपणा येतो. अशा गर्विष्ठ व्यक्तींचे गर्वहरण होणे गरजेचे असते. गर्विष्ठ व्यक्ती गरजेपेक्षा जास्त गर्विष्ठ होऊ लागली तर अशा गर्विष्ठ व्यक्तीला कोणी तरी वरचढ गुरु भेटतो आणि त्याच्या गर्वाचे घर खाली होते. 'गर्वाचे घर खाली' ही म्हण गर्विष्ठ लोकांचे गर्वहरण करणारी आहे. होय हे खरे आहे की गर्वाचे घर खाली होते पण त्यासाठी काळ आणि वेळ जुळून यावे लागतात. धार्मिक ग्रंथात गर्वहरण करणाऱ्या अनेक कथा वाचायला मिळतात. तसेच इतिहासात अशी खूप गर्वहरण करणारे उदाहरणे आहेत. विनाकारण किंवा क्षुल्लक कारणावरून नेहमी युद्ध करणाऱ्या लोकांचे गर्वहरण तथागत गौतम बुद्धांची शिकवण व त्यांची अहिंसा करते.

महाराष्ट्राच्या पावन भूमित स्वराज्य म्हणजेच रयतेचे राज्य स्थापन करुन छत्रपती शिवाजी महाराजांनी भारतातील जुलमी व अन्यायी राजवटीचे वर्चस्व मोडून त्यांचे गर्वाचे घर खाली केले. महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी मुलींसाठी व अस्पृश्यांसाठी शाळा सुरु करुन शिक्षण फक्त आमची मक्तेदारी असे समजणाऱ्या लोकांचे गर्वहरण केले. ज्ञानाचे महासागर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मनुस्मृतीचे दहन केले आणि जाती धर्माचा गर्व बाळगणाऱ्या लोकांचे गर्वहरण केले. तसेच त्यांनी संसदेत हिंदू कोड बिल आणून सर्व क्षेत्रातील पुरुषांची मक्तेदारी मोडीत काढली. अनेक दर्जेदार पुस्तकांचे लेखन करुन साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी मराठी साहित्य क्षेत्रातील काही ठराविक साहित्यकांची मक्तेदारी नष्ट केली आणि स्वतःला श्रेष्ठ मानणाऱ्या साहित्यकांचे गर्वहरण केले. आता गर्वहरणाची अलीकडील उदाहरणे पाहू.वेस्ट इंडिजच्या क्रिकेट



टिमचे कपिलदेव व त्यांच्या सहकारी खेळाडूंनी १९८३ साली गर्वहरण केले.महेंद्रसिंग धोनीने क्रिकेट खेळात गुणवत्तेच्या जोरावर एंट्री केली आणि गुणवत्तेच्या जोरावर क्रिकेट खेळातील ठराविक लोकांच्या वर्चस्वाला तडे घातले. ए.आर. रहेमान या संगितकाराने संगीत क्षेत्रात आपले अढळ स्थान निर्माण केले आणि कैक संगितकारांचे गर्वाचे घर खाली झाले.सुमन कल्याणपूर, अनुराधा पौडवाल या गायिकांनी संगीत क्षेत्रात वर्चस्व प्रस्थापित केलेल्या गायिकांचे अढळस्थान डळमळीत केले. काही वर्षांपूर्वी महाराष्ट्रात दरवर्षी दहावी बोर्ड परीक्षा व बारावी बोर्ड प्रतीक्षेतील पहिल्या तीस गुणवंतांची गुणवत्ता यादी जाहीर होत असे. ठराविक समाजातील विद्यार्थी नेहमी गुणवत्ता यादीत झळकायचे. कालांतराने त्यात बदल झाला या गुणवत्ता यादीत गोरगरिबांची, मागासवर्गीयांची आणि झोपडपट्टी मधील मुलेमुली स्थान मिळवू लागले. त्यांची संख्या वाढत गेली आणि ठराविक लोकांचे गर्वहरण झाले.हे सहन न झाल्याने गुणवत्ता यादी जाहीर करणे कायमचे बंद केले गेले. म्हणून मुद्दाम सांगावे वाटते की या जगात कोणतीही गोष्ट शाश्वत व चिरकाळ टिकणारी नसते. कोणीही कशाचाही गरजेपेक्षा जास्त गर्व बाळगू नये. गर्विष्ठ व्यक्तींनी गर्विष्टपणात जास्त रममाण होऊ नये. काळ आणि वेळ जुळून आला की गर्वाचे घर खाली व्हायला वेळ लागत नसतो हे लक्षात ठेवावे.

# माणसा कधी होशील रे माणूस ?



बुद्धभूषण चं. कांबळे
संपर्क क्र. 7498715661

आधुनिक केसरी

**आजकालचा जमाना इतका बेकार निघालाय कि त्यांना माणसासारखे वागायला व माणसासारखे जगायला नको वाटत आहे. उलट चांगले न वागता रानटी जनावरांनप्रमाणे जगणे व वागणे हे त्यांना आवडत आहे. माणूसकीला लाथाडून पशू प्रमाणे जगण्याला काय अर्थ? आजकाल माणूसकी नावालाच राहीली आहे. माणूसकी नावाची गोष्ट संपत चालली आहे. कारण माणसासारखे वागताना तर कोणी दिसत नाही. केवळ बोटावर मोजण्या इतकेच माणसे माणूसकीला जिवापाड जपत आहेत. परंतू कपटी, नीच, ढोंगी व लबाड लोकांचा सुळसूळाट वाढला आहे.**

पृथ्वीवरचा सर्वांत हुशार आणि बुद्धिमान प्राणी मानव आहे. त्याला बोलता येते, वाचता येते आणि विचारही करता येतो. त्याच्या विलक्षण बुद्धीच्या जोरावर तो हवे ते करू शकतो, असे आपण म्हणतो. पण, तोच माणूस आज माणसाच्या जिवावर उठला आहे, हे सत्य आपण नाकारू शकत नाही. माणूस माणसाची हत्या करतो. माणूसच माणसाला संकटात टाकतो. मीच जगज्जेता आणि मीच सर्वश्रेष्ठ, या मिथ्या अभिमानात माणूसच माणसाला संपवत चालला आहे. यावरून माणसाचा उलटा प्रवास सुरू झाला आहे, याची खात्री देणाऱ्या काही घटना नुकत्याच घडलेल्या आहेत. त्या माणूस म्हणून समजून घेणे काळाची गरज आहे.

एक दिवस कोरोना विषाणू आपण नष्ट करू. पण, ज्या दिवशी जगातील आणि विशेषतः भारतातील विषमतेच्या विषाणूचे उच्चाटन होईल, त्या दिवशी समतामूलक समाजाची निर्मिती झाल्यावाचून राहणार नाही. पण, हे दिवास्वप्न हजारो वर्षांपासून साकार व्हायचे नाव घेत नाही. उलट दिवसेंदिवस अरविंद बनसोडे आणि विराज जगताप याला बळी पडत आहेत. ही विषमता आमच्या सर्वांगात भिनली आहे. जात, वर्ग, वर्ण, तर कधी धर्म आणि संप्रदायाचे विखारी रूप घेऊन मानगुटीवर बसलेली आहे. म्हणून खैरलांजी, गुजरात, उन्नान, सोनई, खर्डा यातून ती उचल खाते. खोटी प्रतिष्ठा, जातीचा अहंकार, सनातनी



धर्मांधता यांनी दलित, आदिवासी व अल्पसंख्याक, कमजोर आणि वंचितांना, अलक्षितांना लक्ष्य केले आहे. "विनायकी' हत्तिणीच्या हत्येने व्याकूळ झालेली कर्मठ मानसिकता बनसोडे आणि जगताप यांच्या बळींनी जराशीही हळहळली नाही. मुंगीला साखर आणि कुत्र्याला भाकर देणाऱ्या देशात बालकाच्या स्पर्शाने मंदिर बाटले, म्हणून त्याचा जीव घेणारी पिलावळ येथे आहे. विषमतेचा हा विषाणू कोरोना व्हायरसपेक्षा महाभयानक आहे, हे वास्तव आपण कसे नाकारणार ?

येवढा माणूस स्वार्थी व नीच प्रवृत्तीचा बनत चालला आहे. लोकांना केवळ स्वतःचेच भले व्हावे व इतरांचे वाईट व्हावे असे वाटत आहे. या नादात एकमेकांना पाण्यात पाहायचे व लोकांचे वाईट चिंतायचे ह्या प्रवृत्तीचे लोक आता मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. समाजात व गावात वावरताना मी असेही माणसे बघतो की जे माणूसकी पाळतात कमी आणि बोलून व दाखवून देतात जास्त जणू काय माणूसकी त्यांच्यातच ठासून भरलेली आहे.असल्या माणूसकीहीन लोकांचा खूपच तिटकारा येतो. परंतू ना इलाजास्तव गप्प बसावे लागते. परंतू एकेकाळी माणूसकीला जिवापाड जपले जायचे. तेव्हा कपटी, नीच, लबाड व ढोंगी लोकांची फौज नव्हती. लोक एकमेकांच्या लग्नकार्यात धावून जायचे. एकमेकांना अर्थिक मदत करायचे. एकमेकांच्या सूख दू:खात धावून जायचे. तत्कालीन लोकांच्या नित्तीमत्ता साफ होत्या. तेव्हा एकत्र कुटूंब पध्दत अस्तित्वात होती.सारे लोक गुण्यागोविंदाने राहायचे. एकमेकांना विचारांची देवाणघेवाण करायचे. गावोगावी मानवता आनंदाने नांदायची. परंतू काळ बदलला काळाच्या ओघात माणसे बदलली. माणसे अतिशहाणे झाली.भावाचेच भले झालेले भावालाच बघवत नाही.बाहेरचा मूलगा अधिकारी झाला तरी चालतो पण भावकीतला किंवा जवळचा व्यक्ती मोठ्या पदावर गेला की यांचा जळफळाट होतो. समाजात खेकडा प्रवृत्तीचे लोक संख्येने फार वाढले आहेत. असल्या माणूसकीहीन लोकांपासून सावध राहा.

सांगायचा मूद्दा काय तर अपघातस्थळी जमलेली जत्रा फोटो काढून सोशल मीडियावर व्हायरल करण्यात व्यस्त राहाते. परतू त्यांना दवाखान्यात नेण्यासाठी कोणीच तयार नसतो.परीणामी त्याचा मृत्यू होतो तेव्हा कळते लोकांची माणसिकता व नित्तीमत्ता. एसटीने प्रवास करत असताना असे निदर्शनास येते की, अपंग व्यक्तींना त्यांच्या आरक्षित जागी कोणीही बसू देत नाहीत. उलट हे महाशय त्यांचा अपमान करतात.व ते बिचारे उभे राहून जातात.एवढा अविवेकीपणा काय कामाचा ? म्हणून जाता जाता तमाम जनतेला कळकळीची नम्र विनंती करतो की, आता लबाडी, ढोंगी व स्वार्थी वृत्ती सोडून द्या. माणसाच्या जन्माला आल्यावर माणसासारखे वागा. मानवता धर्म मनापासून पाळा.अडल्या नडलेल्यांना व गरजवंतांना होता होईल तेवढी अर्थिक मदत करा. नाहीतर माणसा माणसा कधी होशील रे माणूस असे म्हणायची वेळ येऊ देऊ नका ? कारण ज्याला माणूसकी कळली तो या जगाच्या पाठीवर कुठेही राहीला तरी त्याला किंमत आहे.येवढे मात्र नक्की...

# एकीकडे कोमेजले, दुसरीकडे उमलले...

आधुनिक केसरी

**हिंदी चित्रपटसृष्टीतील एका नामवंत संगीत दिग्दर्शकाने एका चित्रपटासाठी परिश्रम घेऊन तयार केलेले गीत त्या चित्रपटाच्या निर्मात्याला पसंत पडत नाही आणि तो आपल्या चित्रपटातूनन ते गीत चक्क वगळतो ! संगीतकार त्या निर्मात्याला गीत न वगळण्याबद्दल परोपरीने विनवितो; पण निर्माता आपल्या म्हणण्यावर ठाम असतो. संगीतकाराचा नाइलाज होतो. गीत चित्रपटातून काढून टाकले जाते. पण चित्रपटाच्या निर्मात्याने गीत आपल्या चित्रपटातून काढून टाकले म्हणून ते टाकाऊ थोडेच ठरले ? त्या गीताच्या नशिबात काही वेगळेच होते ! त्या संगीतकाराला संगीत दिग्दर्शनासाठी मिळालेल्या दुसऱ्या चित्रपटाने मात्र त्या गीताचे सोने केले. किंबहुना ते गीत त्या चित्रपटाचे प्रमुख आकर्षण ठरले !**

ही घटना १९६३ सालची ! दिलीप कुमार आणि वैजयंतिमाला नायक-नायिका असलेल्या `लीडर` या चित्रपटाची निर्मिती सुरू होती. दिग्दर्शक राम मुखर्जी त्याचे दिग्दर्शन करीत होते आणि निर्माते होते सशधर मुखर्जी. प्रतिभावंत गीतकार शकील बदायुनी यांनी या चित्रपटाची गीते लिहिली होती आणि नामवंत संगीत दिग्दर्शक नौशाद (अली) यांनी संगीत दिले होते. त्या चित्रपटात मोतिलाल, जयंत, नझीर हुसेन, लीला चिटणीस, सप्रू, हिरालाल आदी कलावंतांच्या भूमिका होत्या. चित्रपटातील एकूण नऊ गीते ध्वनिमुद्रित झाली होती. ती लता मंगेशकर, मोहम्मद रफी आणि आशा भोसले या अव्वल पार्श्वगायकांनी गायिली होती. त्यात लता मंगेशकर आणि मोहम्मद रफी यांचे एक द्वंद्वगीत (विरहगीत) होते. गीताचे बोल होते : "याद में तेरी जाग जाग के हम, रात भर करवटें बदलते हैं, हर घडी दिल में तेरी उल्फत के, धीमे धीमे चिराग जलते हैं". हे गीत दिलीप कुमार आणि वैजयंतिमाला यांच्यावर चित्रित केले जाणार होते. विरहाने व्याकुळ झालेल्या प्रेमी युगुलाचे मनच गीतकार शकील बदायुनी यांनी शब्दांकित केले होते आणि नौशाद यांनी त्याला लावलेल्या हळुवार चालीने गीत मनाला स्पर्शून जाईल असेच बनले होते. पण निर्माते सशधर मुखर्जी यांनी गीत ऐकले मात्र आणि आपली नापसंती व्यक्त केली. नौशाद त्यांच्याकडे बघतच राहिले. नौशाद यांना मुखर्जी म्हणाले, की नौशादजी `लीडर`ची पटकथा वेगवान आहे आणि तीत हे संथ गतीचे गीत चपखल बसणार नाही ! आपण ते चित्रपटात घेऊ नये असे मला





वाटते ! ते ऐकून नौशाद काहीसे हबकलेच ! ते मुखर्जी यांना म्हणाले, की हे गीत चित्रपटाचे एक लोकप्रिय गीत ठरेल हे मी आपणांस खात्रीपूर्वक सांगतो. पण तरीही मुखर्जी यांना ते पटले नाही आणि त्यांनी आपले म्हणणेच योग्य असल्याचे ठामपणे सांगितले. नौशाद यांनी त्यांना समजावून सांगण्याचा आटोकाट प्रयत्न केला परंतु मुखर्जी यांनी त्यांचे काहीही ऐकले नाही. मग मात्र नौशाद यांचा नाइलाज झाला. अखेर ते विरहगीत `लीडर` चित्रपटातून वगळण्यात आले. काही दिवसांनी निर्माते-दिग्दर्शक हरनाम सिंह (एच. एस.) रवैल यांनी आपल्या नव्या चित्रपटाला संगीत देण्यासाठी नौशाद यांना करारबद्ध केले. नौशाद संगीत दिग्दर्शक म्हटल्यावर गीतलेखनाची जबाबदारी अर्थातच शकील बदायुनी यांच्यावर सोपविण्यात आली होती. तो चित्रपट मुस्लिम पार्श्वभूमीच्या कथेवर आधारलेला होता. त्या चित्रपटाचे नाव होते `मेरे मेहबूब` आणि त्यात अशोक कुमार, राजेंद्र कुमार, साधना, प्राण, निम्मी, जॉनी वॉकर आदी कलावंत होते. यथावकाश रवैल आणि नौशाद यांची त्या चित्रपटातील गीतांबद्दल चर्चा सुरू असताना नौशाद यांच्या मनात एक विचार चमकून गेला. `मेरे मेहबूब` या चित्रपटाच्या कथेत नायक-नायिका यांच्या प्रेमावरच अधिक भर देण्यात आला होता. सशधर मुखर्जी यांनी जे गीत `लीडर` चित्रपटात समाविष्ट करण्यास ठाम नकार दिला होता ते गीत आपण रवैल यांच्या या चित्रपटाला का देऊ नये असे नौशाद वाटू लागले. ते रवैल यांना म्हणाले, की रवैल साहेब, आपला चित्रपट प्रेमकथेवर आधारलेला आहे आणि माझ्याकडे एक विरहगीत तयार आहे. आपण म्हणत असाल तर ते गीत मी आपणांस ऐकवू इच्छितो. रवैल यांनी गीत ऐकण्याची इच्छा व्यक्त करताच नौशाद यांनी त्यांना ते विरहगीत ऐकविले. रवैल यांनी ते लक्षपूर्वक ऐकले आणि त्यांना ते अतिशय आवडले. ते नौशाद यांना म्हणाले, की ताबडतोब सशधर मुखर्जी यांच्याशी संपर्क साधून ते गीत माझ्या चित्रपटासाठी विकत घ्या.

नौशाद यांनी सशधर मुखर्जी यांची भेट घेतली. ते मुखर्जी यांना म्हणाले, की आपण `लीडर` चित्रपटातून काढून टाकलेले गीत निर्माते-दिग्दर्शक हरनाम सिंह रवैल यांना त्यांच्या नव्या चित्रपटासाठी हवे आहे. आपण ते त्यांना विकत देऊ शकता का ? सशधर मुखर्जी यांनी विचार केला की नाही तरी आपण ते गीत `लीडर` चित्रपटात वापरणार नाहीच आहोत; त्यावर खर्चही झालेला आहे. ते तसेच डब्यात पडून राहण्यापेक्षा जर त्याची चांगली किंमत मिळण्याची संधी अनायासे आलेली आहे तर ती का सोडा ? मुखर्जी यांनी आपण रवैल यांना गीत विकत देण्यास तयार आहोत, असे नौशाद यांना सांगितले. त्यानंतर मुखर्जी यांनी ते गीत घसघशीत किंमतीत रवैल यांना विकत दिले.

रवैल यांनी "याद में तेरी जाग जाग के हम..." हे गीत हाती आल्यावर गीतातील शब्दयोजना आणि चाल लक्षात घेऊन त्याबरहुकूम ते राजेंद्र कुमार आणि साधना या अव्वल कलावंतांवर चित्रित केले. गीताचे चित्रीकरण उत्तम आणि परिणामकारक झाले. या गीताव्यतिरिक्त `मेरे मेहबूब` चित्रपटासाठी नौशाद आणि शकील बदायुनी या प्रतिभावंत जोडीने " मेरे मेहबूब तुझे मेरी मोहब्बत की कसम ", " मेरे मेहबूब में क्या नहीं क्या नहीं ", " तेरे प्यार में दिलदार जो है मेरा हाल-ए-इजहार ", " ऐ हुस्न जरा जाग तुझे इश्क जगाए ", अशी एकापेक्षा एक श्रवणीय गीते प्रेक्षक आणि श्रोत्यांसाठी सादर केली. `लीडर`या चित्रपटासाठी याच जोडीने "तेरे हुस्न की क्या तारीफ करूं कुछ कहते हुए भी डरता हूं", "अपनी आजादी को हम हरगिज मिटा सकते नहीं ", " मुझे दुनिया वालों शराबी न समझो, मैं पीता नहीं हूं ", "हम ही से मोहब्बत हम ही से लडाई ", " एक शहनशाह ने बनवाके हसीन ताजमहल " आदी गीते दिली होती. `लीडर` चित्रपटात दिलीप कुमार-वैजयंतिमाला तर `मेरे मेहबूब` चित्रपटात राजेंद्र कुमार-साधना या हमखास यशस्वी व लोकप्रिय होणाऱ्या जोड्या होत्या. दोन्ही चित्रपटांचे चित्रीकरण १९६३ साली सुरू झाले होते. `मेरे मेहबूब` १९६३ सालीच प्रदर्शित झाला पण `लीडर`१९६४ साली पडद्यावर झळकला. दोन्ही चित्रपटांचे संगीत दर्जेदारच होते तरीही `मेरे मेहबूब`ची सगळीच गीते लोकप्रिय झाली. त्यातही सशधर मुखर्जी यांनी `लीडर`साठी नाकारलेले गीत `मेरे मेहबूब`चे प्रमुख आकर्षण ठरले आणि नौशाद यांचा आपल्या गीतावरील दुर्दम्य विश्वास सार्थ ठरला.

अनिल रा. तोरणे
९२२६१६०६५४

# रुग्णसेवा हे व्रत असते



सुशील गायकवाड
संपर्क क्र.: 9309474068

आधुनिक केसरी

**गेल्या महिन्यात म्हणजे एक ऑक्टोबर रोजी आम्ही सारे टीम गडचिरोली येथे आयोजित केलेल्या फ्री सर्जरी कॅम्प साठी रवाना झालो.मी नेहमी सांगतो की हा कॅम्प म्हणजे गडचिरोली तीर्थयात्रा असते.आमचे कर्मयोगी डॉक्टर अभय आणि राणी बंग ( विठ्ठल रखुमाई) यांचे दर्शन होते. प्रत्येक वेळी नवीन विचार,आनंद,अमृत आणि एनर्जी होऊन आम्ही आपापल्या घरी परत येतो. आम्ही म्हणजे एक टीम.surgeons,gynaecologists, anasthesialogist,urosurgeon,plastic surgeons,assistants, साधारणपणे १८ जण असतो.**

गडचिरोली येथे जाण्याचे हे एकविसावे वर्ष. दरवर्षी दोन वेळा. मार्च आणि सप्टेंबर.यंदाही आम्ही सगळ्यांनी मिळून ऑक्टोबर कॅम्प मधे विविध प्रकारची जवळपास ९० ऑपरेशन केली.त्यातील ८० टक्के MAJOR OPERATIONS होती. "SURGICAL STRIKE "संपल्यानंतर जंगल सफारी असतेच. यावेळी आम्ही चंद्रपूरला प्राचीन वाडे, देवळे पहायला गेलो होतो. पाच ऑक्टोबर रोजी आमचा परतीचा प्रवास सुरू झाला. संध्याकाळी उशिरापर्यंत सारे जण आपापल्या घरी पोहोचले. नंतरही सर्च मधून मला रोज नियमितपणे फोन येत होते. सर्व रुग्ण STABLE होते. अचानक १२ ऑक्टोबरला फोन आला की एका रुग्णाला आतड्याला तिढा पडला आहे आणि त्याचे ताबडतोब पुन्हा एकदा ऑपरेशन करावेच लागेल. फोन दुपारी साधारण साडेचार वाजताचे दरम्यान आला.मी LUNCH करीत होतो. अजून एक EMERGENCY OPERATION करणेचे होते.ते उरकले तातडीने विमान BOOKING हवे होते.मी, माझा भाऊ डॉ. विद्याधर आणि डॉ.सचिन अशी टीम तयार झाली. अम्मा (डॉक्टर राणी बंग) यांच्याशी बोलणे झाले. माझे गुरू डॉक्टर रवींद्र वोरा सर यांच्याशी चर्चा केली. त्यांचे आशिर्वाद घेतले. लोणंदमधून निघायला जवळजवळ साडेसात वाजले. रात्रीची बाराची FLIGHT BOOK केली. ती त्या दिवशीची सर्वात लवकरची FLIGHT होती. योग्य वेळेत विमान तळावर पोहोचलो.FLIGHT वेळेत निघाली.

पहाटे दोन वाजता विमान तळावरून बाहेर आलो. आमच्यासाठी सर्च संस्थेने एक भाड्याची कार BOOK केली होती. नागपूरहून गडचिरोली १८० किमी आणि पुढें १८ किमी सर्च या संस्थेत असा प्रवास होता.

अगोदरच कारच्या ड्रायव्हरचे नाव,फोन नंबर पाठविला होता. बाहेर आलो, ड्रायव्हरला फोन केला. लगेचच तो आला. ड्रायव्हर शेजारी डॉक्टर सचिन, मी आणि विद्याधर मागे बसलो. नेहमीप्रमाणे ड्रायव्हरची चौकशी केली. झोप झाली आहे का? गडचिरोली रस्ता माहीत आहे का? वगैरे विचारले. सगळी अपेक्षित उत्तरे मिळाली. आम्ही खूष होतो. १५ ते २०किलोमीटर झालेवर मुख्य रस्त्याला लागलो. रस्ते खुप छान होता. वीस वर्षात हा खुप मोठा फरक पडला आहे. हल्ली ट्रॅफिक पण थोडे फार होते.मधेच एका चहाच्या टपरीवर थांबलो. मस्त पैकी चहा घेतला. ड्रायव्हरने तोंड धुतले, फेस वॉश घेतला. आम्ही गाणी लावली. ड्रायव्हर



जागा रहावा. यासाठीच्या अशा क्लृप्त्या लढवत होतो. रस्ता आता एकाकी पडला होता.ट्रॅफिक कमी होते. थोडे पुढे गेलो तर गाडी सरळ रस्त्यावर वळणे( SINUOUS )घेउ लागली. ड्रायव्हरला झोप येत होती. बिचाऱ्याची आधी झोप झाली नसावी.किंवा दिवसभर ड्रायव्हिंग करून पुन्हा हा कॉल घेतला असावा. शेवटी माणूस कशासाठी कशासाठी? पोटासाठी पोटासाठी? सारे करतो. विद्याधर आणि सचिनने गाडी थांबविली. ड्रायव्हर यांना मागे बसायला सांगितले. तोपर्यंत आमचा रस्ता चुकला होता. आम्ही ताडोबा जंगलातून चाललो होतो. ड्रायव्हर गाडीतून खाली उतरायला घाबरला. कारण गेल्या आठवड्यात एका मुलीला पहाटे एका वाघाने मारले होते. वाघांना खायला कमी पडल्यामुळे आता ते MAN EATERS झालेत. पटकन कसेतरी ड्रायव्हर उतरला आणि विद्याधर, सचिन यांनी गाडीचा ताबा घेतला आणि आम्ही सारेजण सकाळीं पावणेसात वाजता सर्चला पोहोचलो. अपेक्षेपेक्षा दोन तास उशिरा...ड्रायव्हर बिचारा ओशाळला होता. परत कधी जाणार असे विचारत होता, अगदी दुपारी पर्यंत तीथेच थांबला होता... आम्ही तिघेही फ्रेश होऊन सकाळीं न्याहारी केली, दांतेश्वरी देवीचे दर्शन घेतले.रुग्णासाठी आशिर्वाद मागितले आणि ऑपरेशन साठी रवाना झालो.ऑपरेशन व्यवस्थित पार पडले. तिथले पेशंट अतिशय सोशिक, समंजस असतात. त्यांच्या डोळ्यात प्रेम आणि आदराची भावना दिसून येते. शब्दांपेक्षा डोळ्यांनी ते जास्त बोलतात.मला नेहमी हे जाणवतं. भावतं. आवडतं.आम्हाला परत यावे लागले. सर आणि अम्मा यांना खुप वाईट वाटले. परत परत ते बोलून दाखवित होतें. आम्हाला खूप संकोचल्यासारखे वाटत होते.संध्याकाळी प्रार्थनेच्या वेळी सरांनी सर्वांसोबत बोलून दाखविले.खरं तर आमची नैतिक जबाबदारी होती कुठल्याही रुग्णाला काहीही COMPLICATIONS झाली की त्याची सर्व जबाबदारी आमचीच असते.रुग्णसेवा हे व्रत असते हे आम्ही सर आणि अम्मा यांच्याकडूनच तर शिकलो ना. प्रत्येक कॅम्पला आजारी असल्या तरी अम्मा दिवस रात्र डोळ्यात तेल घालुन प्रत्येक रुग्णाची सेवा करतात.रुग्ण STABLE करून आम्ही रात्री ११वाजता सर्च मधून निघालो. नागपूरला सर्च चीच गाडी आम्हाला होती. वाटेत जंगल सफारी जणू होती.दोन वेळा कोल्हे आणि एकदा वाघोबाचे दर्शन झाले... हा हा. ट्रिप मस्त झाली.

# संयुक्त राष्ट्र संघाचा युद्धबंदीचा प्रस्ताव योग्यच

आधुनिक केसरी

संयुक्त राष्ट्र संघाचा युद्धबंदीचा प्रस्ताव योग्यच, परंतु हमास सारख्या आतंकवाद्यांचे काय? युद्ध थांबायला हवे, कोणत्याही युद्धामुळे कोणालाच फायदा झालेला नाही उलट नुकसानच झाले आहे ही बाब आपण उघड्या डोळ्यांनी पाहत आहोत.एकीकडे पॅलेस्टिनींच्या जिवन-मरणाचा प्रश्न तर दुसरीकडे हमासच्या इस्रायलवरील कायरतापुर्वक हल्ल्याने नेतन्याहू हमासला मिटविण्याची शपथ घेतली आहे.नेतन्याहू म्हणतात की युद्ध विराम स्वीकारने म्हणजे शरणागती पत्करने.हमास जोपर्यंत शरणागती पत्करत नाही तोपर्यंत युद्ध थांबणार नाही असे स्पष्ट संकेत इस्रायलचे पंतप्रधान नेतन्याहू यांनी संयुक्त राष्ट्रांला दिले आहेत. जगात आतंकवाद ही विकासाच्या दृष्टीकोनातून व मानवतेच्या दृष्टिकोनातून लागलेली मोठी किड आहे.याला सर्वप्रथम संपुष्टात आणण्याचे काम



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

संयुक्त राष्ट्र संघाने करायला पाहिजे व आतंकवाद्यांना मदत करणाऱ्या देशांच्या मुसक्या आवळायला हव्यात.आज इस्रायल गाझावर का हल्ले करीत आहे याचा अभ्यास संयुक्त राष्ट्र संघाने करायला पाहिजे.कारण हमास आतंकवाद्यांनी इस्रायलवर अचानक ७ ऑक्टोबरला पाच हजार मिसाईल डागले त्यातील चोविसशे मिसाईल इस्रायलच्या अनेक भागात पडले व सव्वीसशे मिसाईल इस्रायलने डीस्ट्राय केले यात हजारो निष्पाप लोकांचा बळी गेला. जर इस्रायलवर संपूर्ण पाच हजार मिसाईल पडले असते तर इस्रायलवर नेस्तनाबूत झाला असता.यावर सुध्दा संयुक्त राष्ट्र संघाने गांभिर्याने विचार करण्याची गरज आहे.त्यामुळे संयुक्त राष्ट्रांनी दहशतवादाविरुद्ध स्पष्ट भूमिका घेवून ठोस संदेश देण्याची गरज आहे.कोणताही दहशतवाद संपूर्ण जगाला हानिकारकच आहे. याकरीता जगाने दहशतवादी कृत्यांचे समर्थन करणाऱ्यां देशांचा जाहीर निषेध करायला हवा व यावर शिक्कामोर्तब संयुक्त राष्ट्रांनी करायला पाहिजे. संयुक्त राष्ट्र संघाने हे लक्षात ठेवायला हवे की गाझा पट्टीत सुरू असलेले इस्रायलचे हल्ल्याना अमानुष नरसंहार म्हणता येणार नाही. कारण आजही गाझातील सुरूंगामध्ये हजारो हमास आतंकवादी लपलेले आहेत सोबतच मिस्त्र मधील आतंकवादी संघटना मुस्लिम ब्रदरहुड, लेबनॉन मधील हिजबुल्ला, सीरियामधील आय.एस.आय.एस.( आलं नुसरा फ्रंट अलकायदा) व इस्रायलच्या नजीकच्या गाझा मधील हमास व इस्लामिक जिहाद या संघटना इस्रायलवर आताही हल्ले करीतच आहेत किंवा करण्याच्या तयारीत आहे व त्याच्या मदतीला अनेक आतंकवादी संघटना व देश सक्रिय भुमिका बजावुन इस्रायलला संपविण्याचा संकल्प केल्याचे दिसून येते.यावरही संयुक्त राष्ट्र संघाने नजर टाकण्याची गरज आहे. एकीकडे तुर्कीची राजधानी इस्तंबूलमध्ये हजारो लोकांनी लाल झेंडे घेऊन इस्रायलच्या **क्रमशः**

# मराठा आरक्षणाची धग कायम : लोहा कडकडीत बंद

## तालुक्यातील अनेक गावांत रास्ता रोको

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी राज्य भर सकल मराठा समाजाच्या वतीने साखळी उपोषण, निदर्शने सुरु असून सरकारच्या नाकर्ते पणामूळे शांत व संयमी आंदोलनाने आणखी उग्र रुप धारण केले असून याच अनुषंगाने सकल मराठा समाजाच्या वतीने लोहा येथे आज लोहा शहर कडकडीत बंद ठेवून राज्य व केंद्र सरकारचा तीव्र निषेध व्यक्त करत एक मराठा लाख मराठा आरक्षण आमच्या हक्काच नाही कुणाचा बापाच अशा प्रचंड गगणभेदी घोषणा देत राज्य व केंद्र सरकारचा निषेध व्यक्त केला.
शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात उपोषण सुरू असुन सकल मराठा समाजाच्या वतीने आज लोहा शहर बंद ची हाक देण्यात आली होती. लोहा शहर बंद ठेवून व्यापाऱ्यांनीही उत्सुर्त प्रतिसाद दिला. सकल मराठा समाजाच्या युवकांनी कंधार रोड धावरी फाटा येथे, नांदेड लातूर नॅशनल हायवे वर हारसद पाटी येथे तसेच तालुक्यातील अनेक गावांत रास्तारोको आंदोलन करण्यात आले. तालूक्यातील सकल मराठा समाज मोठ्या संख्येने सहभागी झाला होता. सरकारच्या नाकर्ते पणामूळे शांत व संयंमी आंदोलकानी अक्रमक रूप धारण असून सरकारने तात्काळ आरक्षण देण्याची मागणी सकल मराठा समाजाच्या वतीने करण्यात आली.
मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी संघर्ष योद्धा मनोज जरांगे यांच्या नेतृत्वात ठिक ठिकाणी अमरण उपोषण सुरु असून आता या आंदोलनाने हिंसक वळन घेतले असून मराठा आरक्षणाचा प्रश्न सरकारच्या वेळ काढू धोरणामूळे आंदोलन अधिक तीव्र होताना दिसत आहे.

लोहा तालुक्यातील खांबेगाव येथील तरुण युवक नारायण पाटील हिलाल हा खांबेगाव येथे चार दिवसांपासून आमरण उपोषणाला बसला असून, त्याची प्रकृती खुप खालावली आहे . वैद्यकीय अधीकारी यांनी तपासणी केली असता आडतीस हजार प्लेटनेट व डब्लउ .बी .सी . आठरासे झाले आहेत उपोषण कर्त्याला रेफर करण्याची आवश्यकता आहे पण उपोषण कर्ता आपल्या आमरण उपोषणावर ठाम असल्याची माहिती वैद्यकीय अधिकारी डॉ .भालेराव मॅडम यांनी दिली .






# राजीव गांधी अभियांत्रिकी महाविद्यालयात लोहपुरूष सरदार पटेल यांना आदरांजली

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** देशाचे पहिले गृहमंत्री लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त राजीव गांधी अभियांत्रिकी महाविद्यालय चंद्रपूर येथे 'एकता दौड यात्रा' आयोजित करण्यात आली. दि. 31 ऑक्टोंबर 2023 रोजी महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित समारोपिय कार्यक्रमाचे उदघाटक प्राचार्य डॉ. प्रविण पोटदुखे होते. तर अध्यक्षस्थानी भाजयुमोचे प्रदेश उपाध्यक्ष युवा नेते रघुवीर अहीर यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यापीठ प्रतिनिधी तेजस ॲलवलवार यांनी केले. कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राध्यापक वृंद, कर्मचारी व विद्यार्थीवर्ग बहुसंख्येने उपस्थित होते.
सुरुवातीला अभियांत्रिकी महाविद्यालय ते गुरूद्वारा पर्यंत 'रन फॉर युनिटी' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यावेळी पार पडलेल्या कार्यक्रमात सरदार पटेल यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून मान्यवर अतिथींनी आदरांजली वाहीली. यावेळी प्राचार्य डॉ. प्रविण पोटदुखे व रघुवीर अहीर यांनी पटेलांच्या कार्याचे स्मरण करीत त्यांनी गृहमंत्री पदावर असतांना देशाच्या ऐक्य व रक्षणाकरीता केलेल्या असामान्य कर्तृत्वाप्रती कृतज्ञता व्यक्त केली. या दौड यात्रेत सहभागी विजयी विद्यार्थ्यांना मान्यवरांनी बक्षिस प्रदान करून सन्मानित केले.

# सुप्रियाताई, तुमच्या खोट्या 'माणुसकी'चा बुरखा टराटरा फाटला : चित्रा वाघ

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** मराठा आरक्षणावरून आंदोलन सुरु असताना ते शांत करण्याऐवजी सुप्रिया सुळे ह्या वारंवार चिथावणीखोर वक्तव्य करत असून यातून त्यांचा खोट्या माणुसकीचा बुरखा फाटल्याची घणाघाती टीका भाजपा महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ यांनी ट्विटद्वारे केली आहे. श्रीमती सुळे यांची कावेबाज 'माणुसकी' प्रत्यक्षात हिडीस आणि ओंगळ आहे. तुम्ही रक्ताची चटक लागलेल्या राजकारणी आहात की काय अशी शंका येत असल्याचे श्रीमती वाघ यांनी ट्विटमध्ये म्हटले आहे.
श्रीमती वाघ यांनी म्हटले आहे की, श्रीमती सुळे यांना जळी,स्थळी,काष्ठी सर्वत्र उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दिसत आहेत. ज्याप्रमाणे कावीळ झालेल्या व्यक्तींना सगळे पिवळे दिसते त्याप्रमाणे श्रीमती सुळे यांना देवेंद्रजींनी काहीही केले तरी त्यात वावगेच दिसते. सुप्रियाताई, हा आजार बरा नव्हे त्यामुळे लवकर उपचार घ्या असा खोचक सल्लाही श्रीमती वाघ यांनी दिला आहे. वड्याचे तेल वांग्यावर ..या प्रमाणे सुप्रियाताई आपल्या भावाचा उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा राग देवेंद्रजींवर काढत असून त्याचा काहीच फायदा होणार नाही. या परिस्थितीत तुमचा चिडचिडेपणा का वाढलाय याचे कारण राज्यातील सूज्ञ जनतेला माहित आहे. सत्ताधारी आमदारांची कदापि तुम्ही चिंता करू नका त्यांचा ठाम विश्वास सरकारवर आहे. तुम्हीच तुमच्या आमदारांची काळजी करा कारण तुमच्याच पक्षातील आमदारांचा तुमच्यावर किती भरवसा आहे हे तुम्हाला कळून चुकले असेलच. 'अर्श से फर्श' अशी केविलवाणी स्थिती तुमची झाली असून याहून अधिक अधोगती ती काय असू शकते असा टोलाही श्रीमती वाघ यांनी मारला आहे.

# भूमिपुत्रांना वीज वितरणचा सकारात्मक प्रतिसाद : लवकरच नवीन ट्रान्सफॉर्मर

आधुनिक केसरी न्यूज

**वाशिम :** रिसोड तालुक्यातील जळालेले ट्रान्सफॉर्मर, रिठदसह, तालुक्यातील इतर वीज उपकेंद्रात असलेल्या बिघडाची दुरुस्ती, आणि तालुक्यातील वीज वितरणच्या अधिकाऱ्यांचा निष्काळजीपणा आदी अनेक सटरफटर कारणांमुळे शेतकऱ्यांना सोसावा लागणारा नाहकचा त्रास या बाबत भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णुपंत भुतेकर यांनी वीज वितरणचे अधिक्षक अभियंता अजय शिंदे यांची भेट घेऊन सदर कामे मार्गी लावण्यासाठी मागणी केली.
अधिक्षक अभियंता शिंदे यांनी भूमिपुत्रचा मागण्यांना सकारात्मक प्रतिसाद देत, येत्या दोन तीन दिवसात सर्व ट्रान्सफॉर्मर बसवून देण्यात येतील व इतर सर्व समस्या मार्गी लावणार असल्याचे आश्वासन दिले असल्याची माहिती भूमिपुत्र संघटनेच्या सूत्रांनी दिली आहे. सदर चर्चेदरम्यान रविंद्र चोपडे, विकास झुंगरे, भगवान गाडे, भीमराव शेजुळ आदींची उपस्थिती होती. तर वीज वितरणकडून अधिक्षक अभियंता शिंदे, शुक्ला, पाठक हे उपस्थित होते.






# अमृत कलश समारोहात रामकृष्ण महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा समावेश

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** मेरी माटी मेरा देश या उपक्रमांतर्गत 'मातीला नमन वीरांना वंदन' या संकल्पनेतून साकारलेल्या दिल्ली येथील अमृत कलश या कार्यक्रमात भारताचे पंतप्रधान आदरणीय मा. नरेंद्रजी मोदी यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या मेरी माटी मेरा देश या उपक्रमात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या अंतर्गत रामकृष्ण वाघ कला व वाणिज्य महाविद्यालय कोराडी रोड,बोखारा महाविद्यालयातील रा.से. यो. विभागातील चार विद्यार्थ्यांचा समावेश करण्यात आला आहे. सुदर्शन निरंजन मालधरे (बी.बी.ए द्वितीय वर्ष), हर्ष पारसे (बी.बी.ए द्वितीय वर्ष), प्राची वानखेडे (बी.बी.ए द्वितीय वर्ष), हार्दिक वानखेडे (बी. ए तृतीय वर्ष) हे दिल्ली येथील कार्यक्रमात सहभागी होण्याकरीता अमृत कलश यात्रेसाठी नागपूरहून दिल्लीला रवाना झाले. या यात्रेकरिता दिल्लीत जाण्यासाठी निवड झाल्याबद्दल आणि आपल्या महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व केल्याबद्दल संस्थेचे सचिव मा. डॉ. मारोती वाघ, संस्थेच्या संचालिका मा. सौ लता वाघ, प्रभारी प्राचार्य श्री. पंकज झगडे आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रम अधिकारी डॉ. अर्चना कहाळे -पत्की यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले त्याचप्रमाणे महाविद्यालयाचे इतर शाखेच्या विभाग प्रमुख आणि सहयोगी प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून अनेकानेक शुभेच्छा दिल्यात. या समारोहात सहभागी होण्याची संधी मिळाल्याबद्दल रामकृष्ण वाघ कला व वाणिज्य महाविद्यालयावर सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.






# इगतपुरी तालुक्यात मराठा आरक्षणासाठी ठिकठिकाणी साखळी उपोषणास सुरुवात

आधुनिक केसरी न्यूज

**इगतपुरी :** तालुक्यात मराठा आरक्षण लढा अधिक तीव्र होताना दिसत असून ठिकठिकाणी साख़ळी उपोषणास मराठा समाजातील युवकानी सहभागी होत सुरुवात केली आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ आणि शासन मराठा समाजाला दिले जाणारे आरक्षण मुद्दाम दिवसेंदिवस उशिर लावत असल्याचा निषेध म्हणून आज सलग दुस-या दिवशी दोन पदाधिका-यांनी आपापले राजीनामे दिले आहेत. धामणी ग्रामपंचायतिच्या माजी सरपंच सौ रंजना विनायक लाड़ आणि वाडिव-हे विविध कार्यकारी सोसायटी संचालक समाधान गवते यांनी आज आओआपल्या पदांचे राजीनामे संबंधित यंत्रनेकडे सादर केले.
मंगळवारी गोंदे दुमाला ग्रामपंचायतीच्या सदस्य सौ दीपिका शरद नाठे यानी राजीनामा दिला आहे. त्यामुळे इगतपुरी तालुक्यात आता मराठा आरक्षण व जरांगे पाटील यांच्या समर्थ नार्थ राजीनामें दिले जात आहे. विशेष म्हणजे यात बिगर मराठा पदाधिकारी ही सामिल झाले आहेत. धामणी उपसरपंच सौ रंजना लाड़ हया कट्टर नाथपंथीय आहेत. त्यामुळे मराठा आरक्षणासाठी आता बिगर मराठा पदाधिकारी देखील सरसावलेले दिसत आहेत. तालुक्यात आज महत्वाची बाजारपेठ असलेल्या घोटी येथे सिन्नर चौफुली,साकुर फाटा,अस्वली स्टेशन, गोंदे दुमाला, मुकने, पाडळी फाटा, अधरवड आदि ठिकाणी साख़ळी उपोषणास सुरुवात झाली आहे. मराठा समाजाचे नागरिक त्यात हिरिरिने सहभागी होत आहेत. तर मराठा ससमाजाच्या सर्वच गावांमध्ये जवळपास पाच दिवसांपासून सर्व पक्षीय लोकप्रतिनिधि यांना कड़क गावबंदी करुण त्यांची गोची केली आहे. दरम्यान उद्या गुरुवार दि 2 नोव्हे पासून तालुक्यातील युवक नेते रतन कारभारी नाठे हे मराठा आरक्षणासाठी अमरण उपोषण करणार आहेत. आपल्या गोंदे दुमाला या गावात मारुती मंदिरासमोर सकाळी आठ वाजता ते उपोषण सुरु करणार आहेत,तसे पत्र त्यांनी तहसीलदार, पोलिस अधिकारी यांना दिले आहे. त्यामुळे आता गावागावात मनोज जरांगे पाटील तयार होऊ लागले आहेत. यावेळी शेकडो समाजबंधव उपस्थित होते.




# सेवानिवृत्ती म्हणजे प्रवासाचा शेवट नव्हे; नव्या आयुष्याची सुरुवात



## बाबाराव पाटील खडसे : अशोक बोंडे सेवानिवृत्त

आधुनिक केसरी न्यूज

**रिसोड :** जीवनाचा प्रदीर्घ कालखंड सेवाकारर्यात घालविल्यानंतर वयोमानानुसार प्रत्येकालाच सेवाकार्यातून मुक्त व्हावे लागते. मग ती प्रशासकीय नोकरी असो, अथवा कुठलीही नेमनुकितील सेवा असो. विहीत वयोमानात सेवानिवृत्त होणे हा प्रशासकीय नियम असला तरी, नैसर्गिक दृष्ट्या खुप महत्वाचा आहे.कारण सेवानिवृत्ती होणे म्हणजे प्रवासाचा शेवट नव्हे;तर ती एक नव्या आयुष्याची आनंदाची सुरुवात असते.असे उद्गगार जीवन विकास संस्थेचे अध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बाबाराव पाटील खडसे यांनी काढले.ते येथील स्व. पुष्पादेवी पाटील महाविद्यालयाचे मुख्य लिपिक अशोक गंगाराम बोंडे यांच्या सेवानिवृत्ती समारोपाच्या कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

रिसोड येथील स्व.पुष्पादेवी पाटील कला विज्ञान महाविद्यालयामध्ये मुख्य लिपिक श्री. अशोक गंगाराम बोंडे यांचा सेवागौरव व निरोप समारंभ कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मा. बाबाराव पाटील साहेब अध्यक्ष जीवन विकास शिक्षण संस्था यांनी भूषविले होते. याप्रसंगी मंचावर मा.अमित पाटील सचिव जीवन विकास शिक्षण संस्था रिसोड, डॉ.व्हि. पी.तुरूकमाने माजी प्राचार्य उत्तमचंद बगडिया कॉलेज रिसोड, डॉ.जे बी देव्हडे माजी प्राचार्य, डॉ.एम. एन. गायकवाड प्राचार्य, सत्कार मूर्ती श्री अशोक बोंडे, श्री.सुधाकर भुतेकर, यांची उपस्थिती होती. संस्थेच्या व महाविद्यालयाच्या वतीने मा.बाबाराव पाटील यांनी श्री.अशोक बोंडे यांचा सपत्नीक शाल,श्रीफळ पुष्पगुच्छ व साडी देऊन सत्कार केला. तद्वतच, बोंडे यांच्या मातोश्री यांनाही साडी देऊन सन्मानित करण्यात आले. संस्थेच्या स्थापनेपासून ते आजपर्यंतच्या प्रवासातील अशोक बोंडे यांच्या मूल्यवान अशा कारकीर्दीवर बाबाराव पाटील यांनी प्रकाश टाकला.तर संस्थेचे सचिव अमित पाटील यांनी कौटुंबिक जिव्हाळ्याचे स्नेहाचे संबंध असेच टिकून राहतील अशी भावना व्यक्त केली. डॉ.जे.बी. देव्हडे यांनी श्री. अशोक बोंडे हे कष्टाळू व्यक्तिमत्व असल्याचे मत व्यक्त केले. डॉ.तुरुकमाने सरांनी बोंडे सरांची शांत,प्रसन्न वृत्ती असल्याचे विचार व्यक्त करून, त्यांच्या सेवाकाळातील आठवणींना उजाळा दिला. सत्कारमूर्ती बोंडे सरांनी याप्रसंगी बोलताना संस्थेला माझी ज्या ज्या वेळेस आवश्यकता असेल तेव्हा मी हजर राहीन अशी कृतज्ञतेची भावना सत्काराला उत्तर देताना व्यक्त केली. महाविद्यालयातील डॉ.रमेश मोरे, डॉ.श्रीहरी पितळे, डॉ.प्रवीण हाडे, डॉ.आदिनाथ बदर, प्रा.केशव कोकाटे,डॉ. सिद्धार्थ इंगोले, प्रा.तुळशीराम भोयर,श्री.संतोष शेरे, कु.छाया खरबळ आदींनी याप्रसंगीआपले भावनात्मक मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. केशव कोकाटे तर आभार प्रदर्शन प्रा. तुळशीराम भोयर यांनी केले.कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापिका व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद उपस्थित होते.

# मराठा समाजाला आरक्षण कसे मिळेल?

## विशाल धेंडे यांचे आरक्षणाबाबतचे विश्लेषण

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** मराठा समाजाला आरक्षण कसं मिळेल? हा मुद्दा घेऊन मांडकी, ता.पुरंदर येथील संविधान अभ्यासक व सत्यशोधक बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विशाल धेंडे हे त्यांच्या अभ्यासपूर्ण विश्लेषणातून मराठा आरक्षण, मनोज जरांगे पाटील, जातवार जनगणना, ५२ टक्के आरक्षण, मागासलेपन, संविधान, आंदोलन, खाजगीकरण, ईव्हीएम मशीन, प्रतिनिधित्व या सारख्या अनेक मुद्यांवर परखडपणे मांडणी करत आहेत. मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला आरक्षण मिळावं म्हणून महाराष्ट्रात खूप मोठं आंदोलन,उपोषण चालू केलेलं आहे. गावा गावातून त्यांना पाठींबा मिळत आहे. मराठा आरक्षण हा संविधानशील असा मुद्दा आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळालंच पाहिजे. तो त्यांचा संविधानिक हक्क आणि अधिकार आहे.मात्र हे जे आरक्षण आहे, ते मिळण्यासाठी संविधानिक मार्गाने लढा द्यावा लागणार आहे.आरक्षणाचा अभ्यास करून नंतर रणनिती ठरवून त्यावर उपक्रम राबवावे लागणार आहेत. कृती कार्यक्रम घ्यावे लागणार आहेत. सर्वात महत्वाचा मुद्दा आहे की जातवार जनगणना करणं गरजेचं आहे. ज्या ज्या प्रवर्गामध्ये ज्या ज्या जाती आहेत.त्यांच्या टक्केवारी नुसार त्यांना आरक्षण मिळाले पाहिजे. त्यासाठी शंभर टक्के आरक्षण घोषित केलं पाहिजे, असे विशाल धेंडे यांनी म्हटले काही लोकं म्हणतात १०० टक्के आरक्षण देता येत नाही. ५२ टक्क्यांची मर्यादा आहे. यावर विशाल धेंडे यांचे असे म्हणणे आहे की, ही मर्यादा कोणी घातलेली आहे. ही मर्यादा सुप्रीम कोर्टाने घातलेली आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानात अशी कोणतीही तरतूद केलेली नाही की ५२ टक्क्याच्या वर देता येत नाही. मग सुप्रीम कोर्टाने जे आदेश दिलेले आहेत. सुप्रीम कोर्टामध्ये कोण आहेत. एक ही मराठा, कुणबी, ओबीसी, एससी, एसटी, एन टी, व्ही जे एन टी, लिंगायत, वारकरी, जैन, मुस्लिम, ख्रिश्चन, बुद्धिस्ट, शिख बहुजन समाजापैकी एक ही कुणी नाही. मग तुम्ही विचार करा की, ही ५२ टक्क्याची अट घातली कुणी? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. आरक्षण का आणि कशासाठी यावर बोलताना विशाल धेंडे म्हणतात की,आरक्षण का? तर कुळवाडीभूषण,बहुजनप्रतिपालक छत्रपती शिवाजी महाराज हे काय आर्थिक दृष्ट्या कमजोर नव्हते.स्वराज्य त्यांचं होतं.तरीही त्यांच्या राज्यभिषेकाला शूद्र म्हणून विरोध करण्यात आला. छत्रपती शाहू महाराजांचा वेदोक्त प्रकरणात अवमान करण्यात आला.ते ही काही आर्थिक कमजोर नव्हते. राष्ट्रपिता जोतीराव फुले पुणे महानगरपालिकेचे नगरसेवक होते बिल्डर होते.



# स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई; चंद्रपुरात 20 लाखांचे अंमलीपदार्थ जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** जिल्ह्यात सातत्याने सुगंधित तंबाखूजन्य पदार्थ व अंमली पदार्थांची आवक मोठ्या प्रमाणात होत असुन यामुळे येथील युवा पिढी प्रचंड व्यसनाधीन होत चालली आहे. या प्रकरणात अनेक नावे समोर येत असुन बल्लारशा तालूका हा अंमली पदार्थ व सुगंधित तंबाखूजन्य पदार्थांचे हब होत असतांनाच पुन्हा एकदा गुन्हे अन्वेषण विभागाने धडक कारवाई करत लाखो रुपयांचे अंमली पदार्थ हस्तगत केल्याची बातमी समोर आली आहे. चंद्रपूर जिल्हा पोलीस अधीक्षक रविंद्रसिंह परदेसी यांचे आदेशाने स्थानिक गुन्हे शाखे मार्फत अवैध अंमली पदार्थ दारू, शस्त्रे, जुगार पैसे यांचे विरोधात राबविलेल्या विशेष मोहीमे दरम्यान दिनांक 30/10/2023 रोजी स्थानिक गुन्हे शाखा कार्यालय चंद्रपूर यांना मिळालेल्या गुप्त बातमीद्वारे दोन इसम खाजगी कारने नागपुर वरून एम. डी. ड्रग्ज पॉवडर विकी करीता सोबत बाळगुन पडोली चौक येथे येणार आहे अशी बातमी मिळाली. सदर माहिती वरीष्ठांना देवुन सदर माहिती वरून पोलीस स्टेशन पडोली हद्दीत थांबले असतांना एक चार चाकी वाहन क्रमांक एमएच-34- बीआर-5951 ही नागपुर कडुन चंद्रपूरच्या दिशेने येतांना दिसली. सदर चारचाकी वाहनास थांबवुन झडती घेतली असता, ड्रायव्हरचे सिटचे बाजुला बसलेला इसम नामे शाहरूख मतलब खान वय 28 वर्ष रा. शालीकग्राम नगर घुग्घुस यांचे हातातील थैलीमध्ये पांढऱ्या भुरकट रंगाचे पॉवडर M. D. (मॅफेड्रान) वजन 198 ग्राम किंमत 19,80,000/- रू तसेच त्याचे ताब्यातील कारची झडती घेतली असता त्यामध्ये एक लोखंडी तलवार किंमत अंदाजे 500 /- रू मिळुन आले.
सदर कार्यवाही दरम्यान दोन्ही आरोपी नामे 1) शाहरूख मतलब खान वय 28 वर्ष रा. शालीकग्राम नगर घुग्घुस ता. जि. चंद्रपूर 2) साहील ईजराइल शेख वय 28 वर्ष रा. शालीकग्राम नगर घुग्घुस ता. जि. चंद्रपूर यांचे ताब्यातून 198 ग्राम एमडी पॉवडर किंमत 19,80,000/- रू, दोन नग विव्हो कंपनीची मोबाईल किंमत 20,000/- रू, एक बलेनो कार एमएच-34- डीआर-5951 किंमत 8,00,000/- रू, आरोपीचे अंग झडतीत नगदी 2200 /- रू, एक लोखंडी तलवार किंमत 500/- रू असा एकुण 28,02,700 /- रू चा मुददेमाल जप्त करण्यात आला. सदर दोन्ही आरोपींना अटक करून पो स्टे पडोली अप क्र. 319 / 2023 कलम 8 (क), 21 (क) गुंगीकारक औषध द्रव्य आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम 1985 सकलम 4, 25 भारतीय शस्त्र अधिनियम अन्वये करण्यात आला. पुढील तपास स्थानिक गुन्हे शाखा येथील सपोनि नागेश चतरकर हे करीत आहे.सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक, चंद्रपूर श्री .रविंद्रसिंह परदेशी, अपर पोलीस अधीक्षक चंद्रपूर श्रीमती रिना जनबंधु यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. महेश कोंडावार सपोनि नागेश चतरकर, PSL विनोद भुरले, PSL अतुल कावळे, पोहवा धनराज करकाडे, स्वामीदास चालेकर, अजय बागेसर, प्रशांत नागोसे, भुषण 'बारसिंगे तसेच पो. स्टे. सायबरचे छगन जांभुळे, अमोल सावे, प्रशांत लारोकर यांनी केली आहे.



# विद्यार्थ्यांनी दिली कृषी पर्यटन केंद्रास भेट

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** तालुक्यातील कंडारी येथील जिल्हा परिषद मराठी शाळेच्या विद्यार्थ्यांनी क्षेत्रभेटी अंतर्गत वाघूर धरणाच्या कुशीत हिरव्यागार फुललेल्या शिवारात असलेल्या परेश कृषी पर्यटन केंद्रास भेट देऊन विविध वृक्षांची सविस्तर माहिती जाणून घेतली. क्षेत्रभेटीत पहिली ते आठवीचे विद्यार्थी सहभागी झाले होते. परिसरातील विविध वृक्ष, फळझाडे, फुलझाडे, वेली, वनस्पती, नवनवीन रोपे यांची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. परेश कृषी पर्यटन केंद्रात असलेल्या विविध निसर्गरम्य ठिकाणांना भेटी देऊन विद्यार्थ्यांनी तेथील माहिती जाणून घेतली. रोज त्याच त्याच कामात व्यस्त असणाऱ्या लोकांना रोजच्या धकाधकीच्या जीवनातून खास वेळ काढून निसर्गरम्य परिसरात रमण्यासाठी शहरापासून थोड्या अंतरावर हे केंद्र आहे. शेतात जाऊन शेती आणि शेतीविषयक बाबींचा अनुभव घेऊन अभ्यास करणाऱ्या लोकांना आपुलकी आणि स्वच्छ हवा देण्याचा कृषी पर्यटनाचा उद्देश असल्याचे परेश कृषी पर्यटन केंद्राचे संचालक प्रमोद बऱ्हाटे यांनी सांगितले. क्षेत्रभेट यशस्वीतेसाठी कंडारी शाळेचे ग्रेडेड मुख्याध्यापक तुषार लोहार, संतोष वानखेडे, मंजुषा पाठक, डॉ. जगदीश पाटील, विनोद जयकर, ज्योती वाघ, सुनंदा रोझतकर, सविता निंभोरे, गणेश तांबे आदींनी परिश्रम घेतले.

# ४२ वर्षांनंतर बालपणीच्या आठवणीत रमले मित्र-मैत्रीणी

## प्राथमिक शिक्षण घेतलेल्या शासकीय शाळांसाठी जमा केला लाखाचा निधी

आधुनिक केसरी न्यूज

**यासीन शेख**

**लोणार :** 42 वर्षानंतर स्नेहसंमेलन सोहळा लोणार सरोवराच्या काठावरील एमटीडीसीच्या मैदानावर नुकता च संपन्न झाला यामध्ये बऱ्याच वर्षानंतर एकत्र आलेले मित्र मैत्रिणी एकमेकांना काय रे? ओळखलंस का?" स्नेह संम्मेलनात भेटलेल्या सर्वांची हीच बिकट अवस्था त्यांच्या चेहऱ्यावरून दिसून येत होती. काहींणी एकमेकांना ओळखले तर बऱ्याच जनांनी सपशेल शरणागती पत्करत, नाही बुवा अशी कबुली दिली. त्यावर ते म्हणाले, अरे मी ***. आपण शाळेत एका वर्गात होतो. ४२ वर्षा नंतर आयुष्याच्या साठीकडे जात असतांना लोणार येथील महाराष्ट्र पर्यटन संकुलावर १९८० -८५ च्या काळातील ७५ जूने क्लासमेट तब्बल ४२ वर्षांनी भेटले....

साठीतल्या जुन्या वर्ग मित्रांचा ४२ वर्षा नंतर या स्नेह सम्मेलनाच्या माध्यमातून एकमेकांना भेटण्याची ही भन्नाट कल्पना साकारली ती लोणार चे सुपुत्र आणि सध्या नागपुर मध्ये आपल्या व्यवसाया निमित्त स्थायिक झालेले एसएमएस कंस्ट्रक्शन ग्रुप चे दिलीप सुराणा,आकोला येथील उद्योजक शैलेश खटोड़, खामगांव येथील अरुणा झांबड, नगरसेवक डॉ.अनिल मापारी,शिवसेना जिल्हा प्रमुख प्रा. बळीराम मापारी, अजय हाडोळे,सुनिल गोलेच्छा , यांच्या अथक प्रयत्नामुळे या सर्वांनी आपल्या जुन्या मित्रांना एका व्हाट्सएप ग्रुप च्या माध्यमातून एकत्रीत केले. या सर्वाना दिलीप सुराणा यांनी प्रत्यक्ष संपर्क साधुन दोन दिवसाच्या स्नेहसंम्मेलनाच्या कार्यक्रमाला येण्याचे आग्राहाचे निमंत्रण दिले तब्बल तीन महिन्या पासून या दोन दिवसीय स्नेह संम्मेलनाच्या कार्यक्रमाची तयारी सुरु होती.आणी याच सोबत आपल्याला पहील्या वर्गापासून शिकवणाऱ्या प्रत्येक शिक्षकांपर्यंत पोहोचून त्यांचा सत्कार करण्यासाठी त्यांना आमंत्रित केले. या वेळी सर्व मान्य वराणी या स्नेहबंधनाच्या कार्यक्रमाला भर भरून शुभेच्छा दिल्या तसेच मैत्रीचा हा जिव्हाळा वयाच्या उतार पणात सर्वाना जगण्याची नव चेतना देणारा ठरणार असल्याने दरवर्षी सर्वांनी एकत्रित येऊन दोन क्षण आपल्यासाठी देण्याच्या आह्वान केले. स्नेह बंधनाच्या दुसऱ्या दिवशी या सर्व मित्रानी आपल्या प्राथमिक शिक्षण घड़लेल्या शहरातील मुलिंची कन्या शाळा, मुलांची बेशीक शाळा, श्री शिवाजी हायस्कूल या शाळांना भेट देऊन शाळेची पाहणी केली यावेळी हे सर्व जुन्या आठवणीत रमले प्रत्येकाने आपल्या वर्ग खोलीत जाऊन जुन्या आठवणीना नव्याने उजाळा दिला.



दरम्यान शिवाजी हायस्कूल च्या वर्ग खोली क्रमांक १७ मध्ये देशाचे या सर्व मित्रांचे वर्ग मित्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हेल्थ अँडव्हाइजर कोअर समितीचे सदस्य असलेले आणि देशातले प्रख्यात कार्डियोलोजिस्ट ह्रुदयरोग तज्ञ डॉ. अजय महाजन सर यांनी सर्वाना निरोगी आणि आपले आरोग्य स्वस्थ ठेवण्यासाठी दैनंदिन जीवनात तंदुरुस्त राहण्यासाठी १ तासाचा क्लास घेउन महत्वाचे मार्गदर्शन केले. तर दिलीप सुराणा यांनी ही शिकवनी घेत सर्वाना शाळेच्या दिवसाची आठवण करून दिली.यावेळी खरं तर एकच म्हणावे लागेल की "आज आपण कोणीही असो, कसेही असो, कुठे असो... आपण आपल्या आयुष्यातली सर्वात अमूल्य चीज शेअर केली आहे... ती म्हणजे आपलं बालपण. गेली ५० वर्षं आपण दूर गेलो होतो . पण आता मात्र कमीत कमी संपर्कात मात्र नक्कीच राहू. नियमितपणे जेवढे जमतिल तेवढे भेटत राहतील . स्नेहबंधना च्या कार्यकमाच्या दुसऱ्या दिवशी डॉ अजय महाजन यांच्या शर्वरी फार्म हाऊस वर सर्व मित्राणी स्नेह भोजन केले. या स्नेह मेळाव्याच्या कार्यक्रमाचे यशस्वीरित्या आयोजन केले दिलीप सुराणा आणि रंजीत रेदासनी, संतोश शर्मा, अक्षय छाजेड़, राहुल भैया त्यांच्या सर्व सहकार्यांनी आणि सर्व मित्राणी या स्नेहबंधना च्या कार्यक्रमातून सर्व मित्राणी जमा केलेल्या राशितुन कन्याशाळा आणि बेसीक शाळेला सीसीटीव्ही कँमेऱ्याचे संच भेट देण्यात आले.तसेच अनाथ आणि गरजु मुलाच्या शिक्षणाचा सर्व खर्च करण्यातसाठी दिलीप सुराणा आणि शैलेश खटोड यांनी निधी जमा करण्याचे आव्हान करताच ३लाख ७१हजार रूपय जमा झाले आणी हा निधी जमा करून त्यावर येणाऱ्या व्याजाच्या पैशातून गरजूंना मदत करण्याचा संकल्प सर्वांनी केला दिलीप सुराणा यांनी ही रक्कम दहा लाखापर्यंत नेण्याचा मानस जाहीर केला आहे. सर्वांना परत एकत्र येण्यासाठी सर्वांनीच परत गेट-टुगेदर दर वर्षी घेण्यात यावे अशी इच्छा प्रगट केली.

# छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात १५ दिवसांसाठी शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण) जिल्हयामध्ये सोशल मिडीयावर वास्तविधानावर इतर कारणावरून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला होता. आगामी काळात उपजिल्हा हिन्दु मुस्लीम किंवा दलीत सवर्ण वाद होऊन कायदा व सुवस्येचा प्रश्न निर्माण होवू नये तसेच आगामी काळात जिल्हयात पोस्टरबाजी वरुन हिंदु मुस्लिम समाजात ते निर्माण होवुन काही अनुचित प्रकार घडु नये तसेच संभाजीनगर जिल्हयात मराठा समाज धनगर समाज आरक्षणा वरुण विविध ठिकाणी मोर्चे, निदर्शने होत आहेत. म्हणून शस्त्र बंदी व जमाव बंदी लागु केली आहे. छत्रपती संभाजीनगर ग्रामीण जिल्हा इष्टीकोणातून परिस्थितीवर नियंत्रण ठेवता यावे यासाठी जमावबंदी शस्त्र बंदी बाबत महाराष्ट्र पोलीस 1951 चे कलम 37 (1) आणि 37 (3) प्रमाणे बंदी आदेश दिनांक 01.11.2023 00.00 वाजे पासून दिनांक 15/11/2023 रोजी 24.00 वाजे पावेतो निर्गमित होणेस विनंती केली आहे. अशा विविध कारणांमुळे छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण) भागात सार्वजनिक शांतता आणि कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 चे कलम 37 (1) आणि 37 (3) अन्वये भी अप्पर जिल्हादंडाधिकारी छत्रपती संभाजीनगर असे आदेशित करीत आहे की, छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण) भागात सकीय कर्तव्य पार पाडणा-या व्यक्ती व्यतिरिक्त अन्य कोणत्याही ठिकाणी अथवा त्यांच्या जवळपास कोणतीही 1. सार्वजनिक ठिकाण किया वापस सोटा, सलवारी, भाले, दंडे बंदुका, रिव्हॉल्व्हर, सुरे. काय किंवा या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल अशी इतर कोणतीही वस्तू जवळ बाळगणार नाही. 2. कोणताही क्षार, द्रव्ये पदार्थ, दाना पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ जवळ बाळगणार नाही. 3. दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे किंवा प्रवर्तक किंवा क्षेपनिक उपकरणे किंवा निकट द्रव्ये गोळा करून ठेवणार नाहीत किंवाजवळ बाळगणार नाही किंवा वाहून नेता येणार नाही. तसेच क्षेपणासाची किया याची उपकरणे किंवा साधने बाळगणार नाही किंवा तयार करणार नाही. 4. कोणत्याही या किंवा समुहाच्या भावना जाणून बुजून देखाव्याच्या उद्देशाने वादये वाजविणार नाही किंवा जाहीरपणे किंवा जाहीरपणे असभ्य वर्तन करणार नाही. प्रतिमा अथवा पते किंवा आकृत्या यांचे प्रदर्शन करणार नाही.5. पोषण देणार नाही, गाणे यांनी जागणार नाही असे करणार नाही.6. अशा प्राधिकाच्या मी ज्यामुळे सभ्यता, अगर नितिमत्तेस धक्का पोहत असी जिल्हयाची किया राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल अशी आवेशपूर्ण आपने करू नये.




# वेरुळ येथे मराठा आरक्षणसाठी साखळी उपोषण

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील वेरूळ येथे दि.०१ सकल मराठा समाजाकडून साखळी उपोषण सुरू करण्यात आले आहे. तालुक्यात मराठा आरक्षण साठी सकल मराठा समाज आक्रमक झाला आहे.तर मराठा योध्दा मा.मनोज जरांगे पाटील यांनी सकल मराठा समाजासाठी आमरण उपोषण केले व आता दुसरा टप्पा उपोषणाचा सुरु केल्याने घर घर,गल्ली गल्ली,गाव गाव, तालुका, जिल्हा पर्यंत हे लोण पोहचले असुण सकल मराठा समाज एकत्रीत संघटीत सतर्क झाल्याने तालुकाभर साखळी उपोषण, आमरण उपोषण, रस्ता रोको, कॅनडल मार्च,रॅली,सभा, भाषणं विविध उपक्रम राबवत सरकारला आवगत करण्याचे प्रयत्न होत आहे.व आता ठिकठिकाणी नव्याने उपोषणे आंदोलने करण्यात येत आहे.आता जगप्रसिद्ध लेणी वेरूळ येथे ही सकल मराठा आरक्षण साठी साखळी उपोषण सुरू करण्यात आले आहे.

# मुलांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण व सायबर सुरक्षा विषयावर जनजागृती सप्ताह

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** मुलांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण कायदा 2012 व सायबर सेक्युरीटी या विषयावर शहरातील विविध शाळांमध्ये जनजागृती सप्ताह राबविण्यात आला. महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार आणि प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या अध्यक्षा समृद्धी भीष्म यांच्या मार्गदर्शनानुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व पोलीस अधीक्षक कार्यालय, सायबर सेल, यांच्या संयुक्त विद्यमाने सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. मुलांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण कायद्याविषयी शालेय विद्यार्थ्यांना माहिती व्हावी, या हेतूने शहरातील विविध शाळांमध्ये जनजागृतीपर कार्यक्रम घेण्यात आले. या माध्यमातून उपस्थित विद्यार्थ्यांना कायद्याविषयीची माहिती देण्यात आली. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव सुमित जोशी यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मुलांच्या लैंगिक अत्याचारापासून संरक्षण कायदा-2012 या कायद्याबाबत विविध उदाहरणे देऊन माहिती दिली. विद्यार्थ्यांनी चांगला स्पर्श, वाईट स्पर्श व सुरक्षित स्पर्शाबाबत जागरूक असले पाहिजे. काही अनुचित प्रकार घडत असल्यास शाळेतील मुख्याध्यापक आणि पालकांना सांगावे, असे आवाहन देखील जोशी यांनी मार्गदर्शनातून केले. सायबर सेप्टी सेलचे मुजावर अली यांनी विद्यार्थ्यांना सायबर गुन्हे कोणकोणत्या प्रकारचे असतात? त्यापासून आपण स्वतः व पालकांना कसे सुरक्षित ठेवावे, याबाबत माहिती दिली. पोलीस उपनिरीक्षक रोशन इरपाचे यांनी विद्यार्थ्यांना वाढत्या गुन्हेगारीपासून कसे परावृत्त व्हावे तसेच कोणत्याही आमिश व प्रलोभनाला बळी पडू नये, याबाबत माहिती दिली. इंदिरा गांधी गार्डन स्कुल, चंद्रपूर, वन अकादमी, शहिद हेमंत करकरे न्यू डॉन इंग्लिश स्कुल, मातोश्री विद्यालय, तुकूम, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्कुल मुरसाळा, महानगरपालिका प्रागंण, चंद्रपूर या याठिकाणी सप्ताह दरम्यान जनजागृतीपर कार्यक्रम घेण्यात आले.

# बिहार येथे हरवलेल्या बालकाला मिळाले पालक

## महिला व बालविकास विभाग व चाईल्ड हेल्पलाईनची संयुक्त कार्यवाही

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** बिहार येथील हरवलेला बालक 25 ऑक्टोबर रोजी रेल्वे पोलीस दलास रेल्वे स्टेशन, चंद्रपूर येथे मिळाला. रेल्वे पोलीस दलाने बालकाबाबत चाईल्ड हेल्पलाईनला माहिती दिली. माहितीच्या आधारे महिला व बालविकास अधिकारी यांच्या मार्गदर्शनात कार्यवाही करण्यात आली. सर्वप्रथम चाईल्ड हेल्पलाईन टीमने रेल्वे स्टेशन, चंद्रपूर येथे भेट देत बालकाची संपूर्ण माहिती घेतली. सदर बालकाची माहिती जिल्हा बाल संरक्षण अधिकारी व बालकल्याण समितीला देण्यात आली. समितीचे आदेशान्वये आणि रेल्वे पोलीस दलाच्या समन्वयाने बालकाला शासकीय बालगृहात ठेवण्यात आले.

चाईल्ड हेल्पलाईन टीमने बालकाच्या पालकांशी संपर्क साधून 30 ऑक्टोबर रोजी बालकल्याण समितीसमोर उपस्थित राहण्यास सांगितले. समितीने सर्व कागदपत्रांची तपासणी करून सदर बालकाला पालकांच्या ताब्यात दिले. या प्रकरणात जिल्हा महिला व बालविकास अधिकारी दीपक बानाईत, बालकल्याण समितीच्या अध्यक्षा क्षमा बासरकर, सदस्या ज्योत्स्ना मोहितकर, अमृता वाघ, वनिता घुमे, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी अजय साखरकर, चाईल्ड लाईनचे प्रकल्प समन्वयक अभिषेक मोहुर्ले आदींनी महत्वाची भुमिका पार पाडली.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम
परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# मंत्रालय प्रवेशद्वार बंद करून आ.फारुख शाह व सहकारी आमदारांचे मराठा आरक्षणासाठी आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** मराठा आरक्षणासाठी संपूर्ण महाराष्ट्रात मराठा समाजाच्यावतीने तीव्र आंदोलन करण्यात येत आहे. आंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे प्राणांतिक उपोषणाला बसले आहेत.एकूणच मराठा समाजाच्या भावना तीव्र झालेल्या आहेत. आ.फारुख शाह यांनी धुळे येथील आंदोलनस्थळी भेट देवून जाहीर पाठिंबा दिला होता. तसेच मुंबई येथे जावून मुख्यमंत्री महोदयांना साकडे घालण्यात येईल आणि सहकारी आमदारांना सोबत घेवून प्रसंगी आंदोलन करण्यात येईल, असे जाहीर केले होते. त्यानुसार आ.फारुख शाह आणि सहकारी आमदारांनी आज मंत्रालयाचे प्रवेशद्वार बंद करून मराठा समाजाला आरक्षण देण्यात यावे यासाठी आंदोलन केले.



सताधाऱ्यांच्या टोलवा टोलवीमुळे मराठा आरक्षणाचा प्रश्न बिकट झालेला आहे. निव्वळ अशा अनागोंदी कारभाराच्या विरोधात मराठा समाज आक्रमक झाल्याचे दिसते.मराठा समाज आरक्षणाच्या मुद्द्याला पाठिंबा देण्यासाठी यापूर्वी धुळे जिल्हा एम.आय.एम.पक्षाच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आले होते. तर आ.फारुख शाह यांच्या नेतृत्वात एम.आय.एम.पक्षाचे सर्व नगरसेवक आणि कार्यकर्त्यांनी धुळे येथील साखळी उपोषणस्थळी भेट देवून पाठिंबा दिला होता आणि जाहीर केले की, आम्ही मराठा समाजाच्या सोबत आहोत. लवकरच याबाबत मंत्रालयात सहकारी आमदारांना सोबत घेवून आंदोलन करण्यात येईल. त्यानुसार आज मंत्रालयाचे प्रवेशद्वार बंद करून आंदोलन करण्यात आले. यावेळी आ.फारुख शाह यांचेसोबत आ.निलेश लंके, आ.बाबाजानी दुर्राणी, आ.दिलीप बनकर, आ.कैलास पाटील, आ.थोपटे,आ. सतिष चव्हाण, आ.काळे, आ. जितेश अंतापुरकर आदी उपस्थित होते.

## संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात २१९ पेक्षा जास्त पक्षी प्रजाती

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी(बीएनएचएस) फेब्रुवारी २०२१ पासून संजय गांधी राष्ट्रीय उद्यान आणि तुंगारेश्वर वन्यजीव अभयारण्याच्या सहकार्याने दर महिन्याला पक्षी गणना आयोजित करते. यात ५०पेक्षा अधिक बीएनएचएसचे सदस्य आणि स्वयंसेवक सहभागी होतात. उद्यान आणि अभयारण्य अशा दोन्हीमध्ये महत्त्वाच्या १२ ठिकाणांवर ती आयोजित करण्यात येते. प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात येणाऱ्या रविवारी या संपूर्ण पक्षीगणनेचे नियोजन वनविभागासोबत मिळून सहाय्यक संचालक डॉ. राजू कसंबे व कार्यक्रम अधिकारी आसिफ खान करतात. यावेळी २९ ऑक्टोबरला ही पक्षीगणना आयोजित करण्यात आली. यात ५० पेक्षा अधिक अभ्यासक व स्वयंसेवक आणि वनखात्याचे अधिकारी सहभागी होते. या गणनेत १०१ पक्ष्यांच्या प्रजातींची नोंद करण्यात आली. यात तीन नवीन प्रजातींचा समावेश करण्यात आला. त्यात भारतीय निलपंख, आखूड बोटांचा चंडोल आणि धूतर ससाणा यांचा समावेश करण्यात आला. त्यामुळे २०२१ पासून तर आतापर्यंत २१९ प्रजाती नोंदवण्यात आल्या.

## खेळाडूंनी घेतला जंगल सफारीचा आनंद

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** बल्लारपूर येथे राज्यस्तरीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धेकरिता आलेल्या खेळाडूंना ताडोबाची जंगल सफारी मोफत करण्याच्या सुचना राज्याचे वनमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी प्रशासनाला दिल्या होत्या. त्यानुसार जिल्हाधिकारी विनय गौडा, मुख्य वनसंरक्षक डॉ. जितेंद्र रामगावकर आणि पालकमंत्री कार्यालयाचे विशेष कार्य अधिकारी डॉ. विजय इंगोले यांच्या मार्गदर्शनात नियोजन करण्यात आले असून आतापर्यंत 225 खेळाडूंनी मोफत जंगल सफारीचा आनंद घेतला आहे. तर पुढील दोन दिवसात आणखी 300 खेळाडूंना ताडोबा सफारी करण्यात येईल, असे जिल्हा क्रीडा अधिकारी अविनाश पुंड यांनी कळविले आहे.

विसापूर (ता. बल्लारपूर) येथील तालुका क्रीडा संकुलात 29 ऑक्टोबर ते 2 नोव्हेंबर 2023 या कालावधीत राज्यस्तरीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेच्या उद्घाटनपर भाषणातच वनमंत्री सुधीर मुनगंटीवार म्हणाले, वाघांच्या भुमीत खेळाडूंचे आगमन झाले आहे. त्यामुळे खेळाडूंनीही वाघासारखाच पराक्रम करावा. जगातील 193 देशांपैकी 14 देशात वाघ आहेत. त्यापैकी 65 टक्के वाघ भारतात असून सर्वाधिक वाघ हे फक्त चंद्रपूर जिल्ह्यात आहेत. त्यामुळे राज्यभरातून बल्लारपूर येथे आलेल्या खेळाडूंना ताडोबाची मोफत जंगल सफारी दाखविण्याचे नियोजन करावे, अशा सुचना त्यांनी प्रशासनाला दिल्या होत्या. त्यानुसार जिल्हा प्रशासन व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाने टप्प्याटप्प्याने खेळाडूंना मोफत ताडोबा दाखविण्याचे नियोजन केले आहे.

## टॉवरवर चढून आरक्षणासाठी आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील गल्ले बोरगाव येथे सकल मराठा समाजाचे मराठा आरक्षण साठी बीएसएनएल च्या टावरवर चढून दि.०१ उपोषण सुरु केले आहे.



आज दि.०१ सकल मराठा समाज गल्ले बोरगावच्या वतीने अनेक आंदोलने करण्यात आली त्यात गावातील श्री प्रकाश भाऊ भागवत यांनी सायंकाळी 10:00 वाजता बी एस एन एल टॉवर वर चढुन आंदोलनास सुरुवात केली आहे. हा ध्येयवादी तरुण समाजकार्यात पहिल्या पासुनच गावात नेहमी अग्रेसर असलेली व्यक्ती म्हणुन त्यांची ख्याती आहे मनोज जरांगे पाटलांची खलावत चाललेली तबीयत सरकारने दाखवलेली अनास्था मराठा आरक्षण साठी रोज जीव गमावत असलेल्या समाज बांधवांचे दुःख मला सहन होत नाही ही भावना मनात घेवुन त्यांने हे आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. आज आमच्या गावातील या तरुण समाज बांधवांची व्यथा प्रशासनाने लवकरात लवकर सरकार पर्यंत पोहचवा ही मागणी सकल मराठा समाजाच्या वतीने करण्याते येत आहे अन्यथा सर्व समाज बांधव याच टॉवर खाली अन्नत्याग आदोंलन करण्याचा इशारा देण्यात येत आहे. त्यामुळे सरकारने प्रकाश भाऊ भागवत यांच्या मागण्या मान्य करत त्यांना खाली घेवुन येण्याचे प्रयत्न सरकारने करावे ही सकल मराठा समाज गल्ले बोरगाव यांची संबंधित प्रशासनास विनंती केली आहे.

# एस.एस.व्ही.पी.एस महाविद्यालयापासून शासकीय तंत्रनिकेतनपर्यंत सीसीटिव्ही कॅमेरे बसवा : युवासेना

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** युवासेना धुळे जिल्हाच्या वतीने आग्रा रोड एस.एस.व्ही.पी.एस महाविद्यालयापासून शासकीय तंत्र निकेतन या रस्त्यावर ५ वाढीव सीसीटिव्ही कॅमेरे बसविण्यासाठी पोलीस अधीक्षक यांना निवेदन देण्यात आले. या रस्त्यालगत रहदारीचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढले आहे, हजारो विद्यार्थ्यांचा वापर दिवसभरात या रस्त्यावरून असतो, या परिसरात अनेक अनुचित प्रकार घडत असतात. मुलींची छेड काढणे, दोन गटात भांडणे, चेन स्नेचिंग, मोबाईल चोरी असे अनेक गैरप्रकार या परिसरात घडत असतात. नमूद परिसरात तीन महाविद्यालये व सहा खासगी ट्युशन क्लास असून गर्दीचा रस्ता आहे, या रस्त्याला लागून सध्या असलेल्या कॅमेऱ्यात वाढीव ५ सीसीटिव्ही कॅमेरे बसवून मिळण्यासाठी पोलीस मुख्यालयाकडून पाठपुरावा करून तातडीने कॅमेरे बसवावे असे निवेदन युवासेना धुळे जिल्हाच्या वतीने देण्यात आले. यावेळी पोलीस अधीक्षक संजय बारकुंड साहेब यांनी विद्यार्थी हित लक्षात घेता ५ नव्हे तर १० सीसीटिव्ही कॅमेरे लवकरच कार्यान्वित करू, असे आश्वासन दिले. निवेदन देतेवेळी युवासेना जिल्हाप्रमुख हरिष माळी, युवतीसेना जिल्हा अधिकारी सोनी सोनार, महानगरप्रमुख सिद्धार्थ करनकाळ, महानगरप्रमुख मनोज जाधव, जयेश सोनवणे, सिद्धेश नाशिककर, जयेश फुलपगारे, शुभम फुलपगारे, तुषार सातपुते, दर्शन खंबायत, हर्षल फुलपगारे, सुमित तमखाने आदी युवासेना पदाधिकारी व युवासैनिक उपस्थित होते.




## हरवलेला मुलगा आढळून आल्यास संपर्क करा

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** आकाश गंगाधर ठाकरे, वय 21 वर्ष हा मुलगा मौजा हडस्ती ता. बल्लारपूर येथे श्री साई कंपनीमध्ये गावातील सिमेंट नालीचे काम करण्यास आला होता. सदर मुलगा 5 सप्टेंबर रोजी पहाटे 4.30 वा. दरम्यान श्री. साई कंपनी हडस्ती येथून बेपत्ता आहे. गावात, नातेवाईक, मित्राकडे विचारपूस केली असता माहिती नसल्याचे आढळून आले. तसेच परिसरात व इतर ठिकाणी शोध शोध घेतला असता सदर मुलगा मिळून आला नाही.

**हरवलेल्या मुलाचे वर्णन पुढीलप्रमाणे :**

मुलाचे वय 21 वर्ष, रंग सावळा, उंची 5 फुट 3 इंच, सडपातळ बांधा, केस काळे उभे, डावा कान टोचलेला, अंगात निळया रंगाचा चेकचा शर्ट, सिमेंट रंगाचा नाईटपॅन्ट, पायात प्लास्टीकची काळ्या रंगाची चप्पल घातलेली आहे. तसेच मराठी व हिंदी भाषा बोलतो. सदर वर्णनाचा मुलगा परिसरात आढळून आल्यास त्याबाबत माहिती द्यावी, असे आवाहन शहर पोलीस स्टेशन,चंद्रपूर मार्फत करण्यात आले आहे.

## अल्पवयीन मुलीशी अश्लील चाळे

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** बहिणीसोबत कॉम्प्युटर क्लासला जात असलेल्या १७ वर्षांच्या अल्पवयीन मुलीशी एका युवकाने अश्लील चाळे केले. या प्रकरणी विनयभंग करणाऱ्या आरोपीला गिट्टीखदान पोलिसांनी अटक केली. राहुल आशिक पंचेश्वर (२०, रा. गिट्टीखदान) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

आरोपी राहुल हा गुन्हेगारी प्रवृत्तीचा असून अल्पवयीन मुलीच्याच वस्तीत राहतो. अल्पवयीन मुलीचा आरोपी राहुल नेहमीच पाठलाग करीत होता. सोमवारी दुपारी २ वाजता आणि सायंकाळी सहा वाजता अल्पवयीन मुलगी कॉम्प्युटर क्लासला जात असताना आरोपी राहुलने तिचा पाठलाग करून तिच्या अंगावरील दुपट्टा ओढून तिच्याशी अश्लील चाळे केले. तसेच तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. अल्पवयीन मुलीने मनाई केली असता आरोपीने शिविगाळ करून तिला पाहून घेण्याची धमकी दिली. घाबरलेल्या अल्पवयीन मुलीने घरी आल्यानंतर कुटुंबीयांना ही बाब सांगितली. त्यानंतर आरोपीने अल्पवयीन मुलीच्या घरासमोर येऊन तिच्या नातेवाईकांना चाकू दाखवून धमकी दिली. या प्रकरणी गिट्टीखदान पोलिसांनी आरोपी राहुल विरुद्ध गुन्हा दाखल करून आरोपीस अटक केली आहे.

## अतिक्रमणाच्या नावाने तणाव निर्माण करणाऱ्यावर कारवाई करा

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरात अतिक्रमणाच्या नावाने तणाव निर्माण करुन जातीय तेढ निर्माण करण्याचे प्रयत्न काही समाजकंटक करीत आहेत असा आरोप करीत व त्यांच्यावर त्वरित कारवाई करण्याची मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने शहर जिल्हाध्यक्ष रणजीत राजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा अतिरिक्त पोलिस अधीक्षक अशोक काळे साहेब यांच्या कडे केली. शहरात धुळे महानगरपालिका जातीयवादी पक्षाच्या काही नेत्यांचा आदेशाने चुकीच्या पध्दितेने अतिक्रमन काढीत आहे. कोणतीही पूर्व सूचना न देता अतिक्रमण काढले जात आहे असा आरोप करण्यात आला ठराविक भागामध्येच अतिक्रमण काढून जातीय तेढ निर्माण करुन शहरात अराजकता पसरविण्याचे काम काही लोक करीत आहेत. यामुळे शहरात धार्मिक वातावरण खराब होत आहे. शहर मध्ये कायदा व सुव्यवस्था चा प्रश्न निर्माण होऊ शकतो. अतिक्रमणाच्या मागे काही दंगल घडविण्याचा हेतू तर



नाही ना?? याचा ही तपास करावा. सद्या सणासुदीचे दिवस आहेत. यामध्ये काही लोक गालबोट लावण्याचे प्रयत्न करू शकतात. तरी अश्या लोकांचा व अनिधिकृत अतिक्रमणाच्या मागील कटकारस्थानी लोकांचा तपास करुन त्यांच्या कारवाई करावी, अशी मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षामार्फत करण्यात येत आहे. यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे रणजित राजे भोसले, जितू पाटील, नगरसेवक लल्लु अन्सारी ,वसीम बारी, मुक्तार मन्सूरी, जमीर शेख, यशवंत डोमाडे, गोरख शर्मा, भिका नेरकर, डॉमनिक मलबारी, शकीला बक्ष, उषाताई पाटील,रईस काझी,अशोक धुळकर, विश्वजित देसले, राजेश तिवारी, मंगलदास वाघ, राजू चौधरी, कुणाल वाघ, दीपक देवरे, भटू पाटील, राजेंद्र सोलंकी, भूषण पाटील, भूषण मोहाडी, आकाश बैसाणे, प्रणव भोसले, समद शेख, अमित शेख , चेतना मोरे,निखिल मोमाया, सागर चौगुले, असलम खाटीक, बरकत शहा, सोनू घारु, हाजी हासीम कुरेशी, फिरोज पठाण, तस्वर बेग, मंगलाताई नवसारे, छायाताई सोमवंशी, जयश्री घेटे, जावीद बेग, नुरुद्दीन शाह, रामेश्वर साबरे, इरफान पठाण, ललित पाटील, चेतन पाटील, मयूर शिंदे, मयूर चौधरी, अभिजित पाटील, युसूब शेख, अंबर मालचे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# युवतींनी नियमित व्यायामातून सदृढ व्हावे : डॉ. नलवडे

आधुनिक केसरी न्यूज

**परभणी :** देशाला सुखी समृद्ध करावयाचे असेल तर देशात राहणाऱ्या नागरिकांनी आहारशास्त्रानुसार जीवनशैली विकसित करत निरोगी समाज निर्माण करावा. आहारातून माणसाला पोषक तत्व लाभतात. विविध आजारांवर उपचार करणारे आपले स्वयंपाक घर आहे. कोणत्या वेळी किती आणि कोणता आहार घ्यावा हे जाणून घेऊनच आजच्या युवक युवतींनी फास्ट फुड आणि विषाक्त आहार आणि ज्यूस पासून दुर राहात सकस व सात्विक आहारातून स्वतःला सदृढ बनवावे, कै.सौ.कमलताई जामकर महिला महाविद्यालय, परभणी च्या होम सायन्स विभागाचे या कामी विशेष योगदान राहिल्याचे समाधान प्रा. डॉ.विजया नलवडे यांनी व्यक्त केले. महाविद्यालयाच्या होम सायन्स विभागाच्या वतीने आयोजित एक दिवसीय कार्यशाळेत आहार व आरोग्य या विषयावर डॉ.विजया नलवडे बोलत होत्या. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. वसंतराव भोसले यांची उपस्थिती होती.व्यासपीठा वर समन्वयक उपप्राचार्य डॉ.संगीता अवचार,होम सायन्स विभागाच्या प्रा. कांचन बनसोडे, प्रा.सना कौसर यांची उपस्थिती होती. कै.सौ. कमलताई जामकर यांचे प्रतिमा पुजन मान्यवरांचे हस्ते करण्यात आले.यावेळी मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.

युवती व महिलांनी आरोग्याकडे जाणिव पूर्वक लक्ष देत स्वतःसह परिवाराचे निरोगीपण जपावे. दररोज च्या आहारातून कुटुंबातील सर्वांना गरजेनुसार पोषक तत्वे कसे पुरविता येतील याचे नियोजन करत औषध मुक्त परिवार घडवावा असे आवाहन प्राचार्य डॉ. वसंतराव भोसले यांनी केले. कवितेच्या माध्यमातून डॉ.संगीता अवचार यांनी आहार आणि व्यायामाचे मानवी जीवनातील महत्त्व पटवून दिले.

पाहुण्यांचा परिचय प्रा. सना कौसर यांनी करवून दिला. संचलन व आभार प्रा.कांचन बनसोडे यांनी केले.





# बल्लापूरच्या विकासाचे सर्वसामान्यच शिल्पकार : पालकमंत्री मुनगंटीवार

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** लोकप्रतिनिधी म्हणून मला बल्लारपूर या स्वतंत्र तालुक्याची निर्मिती करता आली, हे माझे सौभाग्य आहे. पण या तालुक्याच्या विकासाचे खरे शिल्पकार येथील सर्वसामान्य नागरिक आहेत, अशी भावना वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री तसेच पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केली. बल्लारपूर तालुका विकासामध्ये असाच कायम अग्रेसर राहावा, यासाठी आपण प्रयत्नशील असल्याचेही ना. मुनगंटीवार म्हणाले. बल्लारपूर येथे नगर परिषद प्रशासकीय बांधकामाचे भुमिपूजन करतांना ते बोलत होते. यावेळी तहसीलदार डॉ. कांचन जगताप, न.प. मुख्याधिकारी विशाल वाघ, कार्यकारी अभियंता मुकेश टांगले, हरीश शर्मा, चंदनसिंग चंदेल, किशोर पंदीलवार, आशिष देवतळे, काशिनाथ सिंह, मनिष पांडे, समीर केने, निलेश खरबडे, राजू दारी आदी उपस्थित होते. बल्लारपूरचा कितीही विकास केला तरी येथील नागरिकांच्या ऋणातून मुक्त होऊ शकत नाही, असे सांगून पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार म्हणाले, विकासाची अनेक कामे या क्षेत्रात झाली आहे. मात्र संपूर्ण शहराचे नियंत्रण ठेवणा-या नगर परिषदेचीच इमारत राहून गेली होती. आज मात्र या इमारतीच्या बांधकामाची पायाभरणी करतांना अतिशय आनंद होत आहे. बल्लारपूरमध्ये रविवारी 1.29 कोटी रुपयांच्या मिनी स्टेडीयमचे भूमिपूजन, 4 कोटी रुपयांच्या रस्ता बांधकामाची पायाभरणी आणि 10 कोटीच्या प्रशासकीय इमारतीची पायाभरणी करण्यात आली आहे. बाहेरून येणा-या व्यक्तीला या शहराचा हेवा वाटावा, असा विकास बल्लारपूरचा झाला आहे. नगर परिषदेच्या इमारतीकरीता जेवढा निधी लागेल, तेवढा दिला जाईल. ही इमारत दर्जेदार आणि अप्रतिम व्हायला पाहिजे, अशा सुचना पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिल्या.वैशिष्ट्यपूर्ण विशेष निधी अंतर्गत नगर परिषद प्रशासकीय इमारतीच्या तळमजला आणि पहिल्या माळ्याचे काम करण्यात येणार असनू यासाठी 9 कोटी 78 लक्ष 71 हजार 792 निधीची तरतूद करण्यात आली आहे. या इमारतीमुळे शहराच्या सौंदर्यात भर पडणार आहे.

**न.प.निवृत्त सफाई कर्मचाऱ्यांचा सत्कार :** नगर परिषदेच्या पायाभरणी समारंभात मुख्याधिकारी विशाल वाघ आणि माजी नगराध्यक्ष हरीश शर्मा यांनी सेवानिवृत्त सफाई कर्मचा-यांचा सत्कार आयोजित केला, ही अतिशय अभिमानाची बाब आहे. या सफाई कर्मचा-यांनी शहराच्या विकासासाठी मोठे योगदान दिले आहे. शहराला स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यासाठी त्यांनी आयुष्यभर सेवा दिली, त्यांच्या सेवेचा हा सन्मान आहे, असे पालकमंत्री म्हणाले.

# स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई गावठी कट्यासहित आरोपी ताब्यात

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** दहशत माजविण्याच्या उद्देशाने आरोपीकडे देशी बनावटीचा गावठी कट्टा बाळगताना मिळून आल्याने स्थानिक गुन्हे शाखेकडून कारवाई करण्यात आली ४२ हजाराच्या मुद्देमाला सहित आरोपी अटक करण्यात आली.
स्थानिक गुन्हे शाखेचे दत्तात्रय शिंदे यांना गुप्त बातमी दारामार्फत माहीती मिळाली की, विशाल भरत पाटील रा. शांती नगर, सुरतवाला बिल्डींगच्या पाठीमागे, धुळे हा दहशत माजविण्याच्या उददेशाने सोबत देशी बनावटीचा गावठी कटटा बाळगत फिरत असतो व तो सध्या हजरत चांद शहावली बाबा दर्ग्याजवळ, राष्ट्रवादी भवन कार्यालयाजवळ, धुळे येथे रस्त्यावर उभा आहे. अशी खात्रीलायक बातमी मिळाल्याने स्थानिक गुन्हे शाखेकडील अधिकारी आणि अंमलदारांना बातमीप्रमाणे कारवाई करण्याचे आदेशित केले. त्या अनुषंगाने पथक रवाना होऊन विशाल भरत पाटील त्या ठिकाणी मिळून आल्याने त्याने पळण्याचा प्रयत्न करीत असतांना त्याला पकडून त्याची पंचासमक्ष अंगझडती घेतली असता त्याच्याजवळ ४०,००० एक देशी बनावटीचे धातुची पिस्तुल तिचे मुठवर दोन्ही बाजुस काळया रंगाचे कव्हर स्कुने घटट बसवलेले स्ट्रायकर पिन असलेली मॅगझिनसह जु.वा. २,००० किमतीचे दोन जिवंत काडतुस पिवळसर धातुचे त्याचे मागील बाजुस बाजुस इंग्रजीमध्ये K F आणि 7.65 मार्क असलेले असा एकुण ४२,०००/- रु. चा मुददेमाल सदर इसमाचे ताब्यात मिळून आल्याने त्यास परवाना आहे का बाबत विचारपुस करता त्याने नसल्याचे सांगितले. तरी सदर देशी बनावटीचा गावठी कटटा हा विशाल भरत पाटील रा. शांती नगर, सुरतवाला बिल्डींगच्या पाठीमागे, धुळे हा दहशत माजविण्याच्या उददेशाने बेकायदेशीररीत्या सोबत बाळगत असल्याची खात्री झाल्याने सदर मुद्देमाल जप्त करून इसमाविरुदध गुणवंत अशोकराव पाटील नेम. स्था.गु.शा. यांचे फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्याची कारवाई चालू आहे. सदरची कारवाई संजय बारकुंड, पोलीस अधिक्षक धुळे, किशोर काळे, अपर पोलीस अधिक्षक धुळे, यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दत्तात्रय शिंदे, पो.उपनिरी. अमरजीत मोरे, पो.उपनिरी. बाळासाहेब सूर्यवंशी, मच्छिंद्र पाटील, रविकिरण राठोड, नीलेश पोतदार, सुशिल शेंडे, हर्षल चौधरी, गुणवंत पाटील, सागर शिर्के अशांनी केली आहे.



गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका
(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजवर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखो पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर